# पवित्र आत्मा काय आहे?
जेफरसनविले, इंडियाना, अमेरिका
५९-१२१६

1 ही सभा जी काही आपण सामान्यतः येथे घेतो त्यापेक्षा थोडीशी भिन्न असणार आहे. बहुधा प्रत्येक समयी जेव्हा आपण येथे एकत्र येतो, ती एक आजाऱ्यांना बरे करणारी आणि शारीरिक गरजेसाठी सभा असते. त्यावर विशेष जोर टाकला जातो. परंतु आज रात्री आपण हे संजीवन जीवाच्या आरोग्यासाठी, मनुष्याच्या आत्म्यासाठी, सुरु केले आहे.

तथापि, परमेश्वराची इच्छा असल्यास, रविवारी सकाळी (रविवारच्या शाळेत, रविवारी सकाळी) आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करणार आहोत एका नियमित आरोग्याच्या रांगेत रविवार सकाळसाठी, परमेश्वराची इच्छा असल्यास. आणि या आठवड्यांतील रात्रीत आपण जीवाच्या अनंत गोष्टींवर बोलण्याकरिता मोठ्या प्रमाणावर दाबले गेले आहोत.

2 आता, आपल्याला ठाऊक आहे की जेव्हा एका शरीराला आरोग्य मिळते, ते आपणा सर्वांना आनंदी करते, कारण आपल्याला ठाऊक आहे की ते निश्चितपणे दाखविते की आपला देव आजाऱ्यांना बरे करतो. परंतु तो आजारी व्यक्ती, जर ते पुरेशा काळापर्यंत जिवंत राहिले, कदाचित परत आजारी होतील, कदाचित त्याच आजाराने ज्यातून त्यांना आरोग्य मिळाले होते. आणि ते आरोग्य काढून घेत नाही. डॉक्टर न्यूमोनियासाठी औषध देईल, आणि त्याने त्यांना न्यूमोनियापासून बरे झाल्याचे घोषित केल्यानंतर, कदाचित दोन दिवसानंतर ते न्यूमोनियाने मरतील. त्याची पुनरावृत्ती होते. परंतु जेव्हा त्या जीवाला आरोग्य मिळते, मग तुमच्याकडे तुमच्यामध्ये अनंत जीवन असते.

आणि मी विश्वास करतो की आपण प्रभू येशूच्या आगमनाच्या इतके निकट आहोत, की आपल्याला ते सर्व काही करणे आवश्यक आहे जे आपण करु शकतो त्या प्रत्येक जीवाला राज्यामध्ये आणण्यासाठी आणि लोकांकडे ते राज्य आणणे, की आपण आपल्या आत्म्यामध्ये बरे व्हावे. मी विश्वास करतो की येशूचा देह हा सर्वात दुर्बल देह आहे जो मला ठाऊक आहे; तो म्हणजे, तो देह, पृथ्वीवर असलेला ख्रिस्ताचा आत्मिक देह हा फार दुर्बल आहे.

3 आणि आता, आम्ही तुम्हाला दीर्घ काळासाठी रात्री थांबवून ठेवण्याची योजना करीत नाही, कारण पहिल्या रात्री आमच्या प्रिय मित्रांना बसण्यासाठी आमच्याकडे जागा नाही. आम्ही नवीन प्रार्थनामंदिर बांधण्याच्या प्रकल्पात आहोत, एक मोठे प्रार्थना मंदिर सरळ येथेच या जागेवर, किंवा जेथे कोठे परमेश्वर नेतृत्व करील; परंतु जेवढे आम्हाला ठाऊक आहे, येथे.

आणि आता, आम्ही बुधवार ते रविवार, सभा ठेवलेल्या आहेत. परंतु मग रविवारी, ते नाताळच्या सुट्यांमध्ये समाप्त होते; परंतु जेव्हा केव्हा परमेश्वर आम्हाला थांबावयास सांगेल, तेव्हा तो समय असेल. आपल्याला ठाऊक नाही अगदी परिणाम काय असेल. परंतु विश्वास करतो की येथे प्रार्थना मंदिरात असणारी माणसे आणि आमच्या भगिनी मंडळ्या, ज्या, त्यातील एक युटिकातील होलीनेस चर्च आहे, ज्यांचा भाऊ ग्रॅहम स्नेलिंग पाळक आहे; आणि न्यू अल्बनीमध्ये, जेथे भाऊ "जुनी" जॅक्सन पाळक आहे; आणि बाहेर राजमार्गावर देखील जेथे भाऊ रुडेल पाळक आहे. आम्ही (आणि या प्रार्थना मंदिराच्या भगिनी मंडळ्या) ... आम्ही आमच्या लोकांना ख्रिस्ताच्या चांगल्या संगतीत आणण्याचा प्रयत्न करीत आहोत; तो आमचा हेतू आहे. तेव्हा पुढच्या काही रात्रीकरिता मी वाचण्यासाठी आणि शिकविण्यासाठी निवडले आहे....

4 आज रात्री मला: पवित्र आत्मा काय आहे? या विषयावर बोलायचे आहे. आणि उद्या रात्री, मला: तो कशासाठी दिला गेला आहे? यावर प्रचार करायचा आहे. आणि शुक्रवार रात्री (आणि ध्वनिमुद्रण करणाऱ्यांसाठी, शुक्रवारी रात्री मला मुद्रण केलेले नको): मी कसा पवित्र आत्मा घेऊ शकतो, आणि मला कसे कळेल जेव्हा तो मला मिळेल? मग आपण फक्त बघू.... मग पहा शनिवारी आणि रविवारी परमेश्वर आपल्याला कसे चालवील ... आणि रविवार सकाळी, एक आरोग्य सेवा आणि दुसरी रविवार रात्रीसाठी सुवार्तिकाच्या उपदेशावर सेवा.

आणि आता आम्हाला हवे आहे की सर्वांना समजावे की.... आणि मला ठाऊक आहे मागच्या खोलीत ध्वनिमुद्रण चालले आहे, आणि आम्ही हे सांगण्याची इच्छा करतो: कारण अशा सभांमध्ये सुवार्तिकाच्या उपदेशावर असणाऱ्या, आमच्याकडे विभिन्न संप्रदायांच्या मंडळ्यांमधून लोक आहेत ज्यांना त्यांच्या स्वतःच्या श्रध्देच्या क्षेत्रात शिकविले गेले आहे - प्रत्येकाला. आणि ते ठीक आहे. मला कधीही बंधुजनांमध्ये मतभेद पेरण्याचा अपराधी असायचे नाही. आणि बाहेर सभांमध्ये, मी फक्त शास्त्रलेखातील महान सुवार्तेच्या सत्यावर प्रचार करतो, त्यावर ज्या भावांनी माझी सभा प्रायोजित केली आहे ते विश्वास करतात. परंतु येथे प्रार्थना मंदिरात, मला ज्यावर आपण विश्वास करतो त्यावर बोलायचे आहे. त्यामुळे, जर तुम्ही ते समजत नाहीत, मी फार खुश होईन तुमच्याकडून एक लहानसे पत्र किंवा नोंद मिळाल्यास ज्यामध्ये तुम्ही मला प्रश्न विचाराल की का आम्ही अशाप्रकारे विश्वास करतो. आणि त्याचे जेवढे शक्य असेल तेवढे उत्तम स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करणे मला आवडेल.

5 तुम्हाला माहिती आहे, प्रत्येक मंडळी.... जर तुमच्याकडे शिकवण नाही, तुम्ही एक मंडळी असू शकत नाही. तुमच्याकडे काहीतरी असणे आहे ज्यासाठी तुम्ही उभे राहता, काही तत्वे जी तुम्ही धरुन ठेवता. आणि पर्वा न करता की काय एका व्यक्तीची संलग्नता किंवा संप्रदाय आहे, जर तो व्यक्ती देवाच्या आत्म्याद्वारे जन्म पावलेला आहे, तो माझा भाऊ किंवा माझी बहीण आहे, पर्वा न करता की.... आपण कदाचित इतर गोष्टींमध्ये पूर्वेपासून पश्चिमे इतके भिन्न असू, परंतु अजूनही आपण भाऊ आहोत. आणि मी काही नाही परंतु त्या भावाला ख्रिस्तामध्ये निकट, आणि चांगल्या प्रकारे चालण्यासाठी साहाय्य करण्याचा प्रयत्न करीन; मग मी विश्वास करतो कोणताही खरा, वास्तविक ख्रिस्तीजन तेच माझ्यासाठी देखील करील.

6 आता, मी या मंडळीला विचारले आहे.... आता, आपण फक्त एका प्रदीर्घ सभेसाठी, यामध्ये प्रवेश करीत नाही. मला यामध्ये प्रवेश करावयाचा आहे - आणि मला हवे आहे तुम्ही आणि तुम्हाला विचारले आहे तुमच्यामागे असलेल्या प्रत्येक बांधाला जाळून टाका आणि प्रत्येक पाप ठीक करा - की आपण यामध्ये आपल्या हृदयात आणि जीवनात जे काही आहे त्याबरोबर येत आहोत. आपण येथे परमेश्वराच्या

आगमनासाठी आपले जीव तयार करण्याच्या एकमेव हेतूनेच यायला हवे, आणि कोणत्या दुसऱ्या हेतूसाठी नाही. आणि जसे मी बोललो आणि म्हणालो, की कदाचित कधीकधी मी शिकवीन किंवा काहीतरी सांगेन जे कदाचित इतर कोणीतरी काय म्हणते त्याच्या थोडेसे विरोधात असेल ... ज्याप्रकारे ते त्याचा विश्वास करतात. मी विवादासाठी आलेलो नाही, तुम्ही पहा. मी आलो.... आपण येथे परमेश्वराच्या आगमनासाठी तयार होण्याकरिता येथे आहोत.

7 आणि मी विचार करतो की हा लहानसा गट.... माझ्याकडे येथे काही माझ्याबरोबर भेट देणारे बंधुजन आहेत जे मला ठाऊक आहे की ते विभिन्न स्थळांवरुन आहेत, आणि त्यांना पाहून आम्ही आनंदित आहोत. आणि शंका नाही परंतु या श्रोत्यांमध्ये तेथे, इतर शहराबाहेरुन आहेत, आमच्या सभोवतालच्या शेजारच्या शहरांतून येथे आहेत. आणि तुम्हाला येथे पाहून आम्ही आनंदित आहोत आणि तुमची एवढी प्रशंसा करतो जर तुम्ही आम्हाला इतके प्रेम करता की येथे येऊन या गोष्टी ऐकता. तुम्ही हे घरी तुमच्याबरोबर घेऊन जावे, माझ्या भावा, बहिणी, देवाची अपार समृद्धी तुमच्या हृदयावर देव ओतो ही माझी प्रार्थना आहे.

8 आणि या लहानशा प्रार्थना मंदिराला, पाहतो की मी विश्वास करतो की हे पृथ्वीवर जे सर्वात उत्कृष्ट लोक आहेत त्यातील एक आहेत असा मी विश्वास करतो, या प्रार्थना मंदिरात जाणारे.... मी कधीही म्हणालो नाही सर्व उत्कृष्ट लोक; मी म्हणालो पृथ्वीवरील काही उत्कृष्ट लोक या प्रार्थना मंदिरात जातात. परंतु दिवसेंदिवस सभापासून ते सभापर्यंत मागे परतताना, मी या प्रार्थना मंदिराची एक महान गरज पाहतो, एक महान गरज यामध्ये आहे, आणि ती भरण्यासाठी किंवा एका पवित्रीकरणासाठी, एका गंभीर जीवनासाठी, एक देवाबरोबरील निकट चालण्यासाठी आहे. आणि हे करण्याचे मी त्यांना अभिवचन दिले आहे, त्यांच्यासाठी हे संदेश देण्यासाठी. आणि तुम्हाला आत आणताना आणि देवाच्या वचना भोवती आम्हा बरोबर संगती करताना आम्हाला आनंद आहे, जसे आम्ही शिकवितो व ते आणण्याचा प्रयत्न करतो.

आता, पहिल्या तीन रात्र आम्ही प्रचार करण्यासाठी एक विषय घेणार नाही, परंतु एक देवाच्या वचनातून शिकविण्यासाठी संदेश. आणि आता ... कारण जे मी स्वतःहून करणार नाही अशी कोणती गोष्ट मी कोणाला करायला सांगणार नाही. आणि हा आठवडा माझ्यासाठी पूर्णपणे कलवरी होता. मी इतका स्मृतिभ्रंश होण्याच्या जवळ होतो, जसे मी ते मांडतो, की मी जवळ जवळ माझ्या भानात नव्हतो. परंतु मी पूर्णपणे मला जेवढे ठाऊक आहे ती प्रत्येक इच्छा व सर्वकाही परमेश्वराच्या स्वाधीन केले आहे.

9 त्या रात्री सुमारे मध्यरात्रीनंतर काही वेळाने, मी आणि पत्नी, बसल्यानंतर, आणि प्रार्थना करताना, आणि एका लहान मेजा सभोवती परमेश्वराशी बोलताना आमच्या समोरच्या खोलीत दोन पवित्रशास्त्र उघडी होती, आम्ही स्वतःला नव्याने देवाला संपूर्ण सेवेसाठी पवित्र केले, की प्रभू येशूची सेवा करण्यासाठी, आम्ही आमची स्वतःची इच्छा, आणि सर्वकाही, आणि प्रत्येक नकारात्मक विचार स्वाधीन करु. आणि मी भरवसा करतो की तुमची देखील तीच वृत्ती असावी, की तुम्ही देखील तीच गोष्ट केली असावी. मग जेव्हा आज रात्री आपण येत आहोत, आपण पवित्र भूमीवर येत आहोत, अशा लोकांमध्ये जे प्रार्थना करीत आहेत, आणि उपवास करीत, आणि पुनर्वसन करीत, आणि देवाकडून काहीतरी प्राप्त करण्यासाठी तयार होत आहेत. आणि मला ठाऊक आहे की तो जो भुकेला येईल तो भुकेला परत जाणार नाही, परंतु देव जीवनाच्या भाकरीने पोषण करील.

आता, आपण त्याच्या पवित्र पुस्तकातून वाचण्याअगोदर, प्रार्थनेसाठी आपण आपली मस्तके फक्त एका क्षणासाठी झुकवुया.

10 परमेश्वरा, आज रात्री या ठिकाणी अगोदरच प्रार्थना अर्पण केली गेली आहे. तेथे.... तुझ्या मुलांद्वारे सियोनेची गाणी गायली गेली आहेत. त्यांची हृदये उंचावली गेली आहेत, आणि आम्ही येथे स्वतःला तुझ्यासाठी पवित्र करण्यास आणि तुझी उपासना करण्यासाठी आमच्या जीवाच्या खोलीपासून आलेलो आहोत. आणि हे आम्ही तुझ्या स्मरणात आणतो, परमेश्वरा, की तू म्हणालास जेव्हा तू डोंगरावर बसलास आणि तुझ्या शिष्यांना शिकविले, "जे नीतिमत्वासाठी भुकेले व तान्हेले ते धन्य, कारण ते तृप्त केले जातील." तू ह्याचे अभिवचन दिले आहे, परमेश्वरा.

आज रात्री आम्ही खुल्या हृदयाने येतो; आम्ही भुकेले व तान्हेले येतो, आणि आम्हाला ठाऊक आहे तू तुझे अभिवचन राखशील.

जशी आम्ही या पवित्रशास्त्रातील पवित्र पाने उघडण्याचा प्रयत्न करतो त्यातून मजकूर वाचण्यासाठी, पवित्र आत्म्याने अगदी तो प्रत्येक हृदयाकडे नेवो. आणि ते बीज त्या खोल, समृद्ध विश्वासात खाली पडो जे प्रत्येक अभिवचन जे वचनाने केले आहे ते उपजवील. आमचे ऐक, परमेश्वरा, आणि आम्हाला शुद्ध कर, आणि आमची पारख कर. आणि जर तेथे आमच्याबद्दल काही अशुद्ध गोष्ट असेल, परमेश्वरा, कोणते कबूल न केलेले पाप, काहीही जे बरोबर नाही, अगदी आताच प्रकट कर, परमेश्वरा. आम्ही सरळ चालत जाऊ आणि ते करु, कारण आम्ही जाणतो की आम्ही प्रभू येशूच्या आगमनाच्या सावलीत जगत आहोत. आणि आम्हाकडे आहे, ओह, पवित्र देवा, आज रात्री तुझ्या न्यायाच्या सावलीत ये, आणि आम्ही नव्या समर्पणाची, आणि पवित्रतेची, आणि आमच्या जीवनामध्ये पवित्र आत्म्याच्या भरण्याची याचना करतो.

संजीवनाचा अग्नी अंधुक होताना पाहत असताना, आपण वचनाचे लाकूड टाकूया, की ते नवीन अग्नी प्रज्वलित करील, की आपली हृदये आवेशाने भरुन जावी. तुझ्या मौल्यवान वचनाद्वारे, आम्हाला पवित्र कर, परमेश्वरा, आणि तुझ्या रक्ताद्वारे, आणि तुझ्या कृपेद्वारे आम्ही याचना करतो; आणि सर्व धन्यवाद आणि प्रशंसा तुझी असेल. आमच्या हृदयातून सर्व पूर्वग्रह काढून टाक; हे परमेश्वरा, आम्हाला शुद्ध कर. आम्हाला शुद्ध हृदय, स्वच्छ हात, आणि स्वच्छ मन दे, की आम्ही तुझ्या भवनात, रातोरात, हर्षाने व तुझ्या आत्म्याने भरलेले असे यावे. आम्ही हे येशूच्या नावात आणि त्याच्याकरिता मागतो. आमेन.

11 मी अगदी आताच वचन वाचण्याची इच्छा करतो. जेव्हा मी तुम्हाला तुमची पवित्रशास्त्र आणण्यास सांगतो, तुमच्या पेन्सिली, शास्त्रलेखासाठी तुमचे कागद, जर तशी तुमची इच्छा असेल, ते फार चांगले असेल. आणि जसे तुम्ही प्रेषित कृत्याचा सातवा अध्याय काढीत आहात सुरुवात करण्यासाठी.... प्रश्नाला उत्तर देण्यासाठी ... किंवा, "पवित्र आत्मा काय आहे?" या प्रश्नाला उत्तर देण्यास सुरुवात करण्यास.

तेथे काही नाही जे सैतानाला पराजित करील; अजूनही पृथ्वीवरील काही नाही जे सैतानाला कधी पराजित करील जसे देवाचे वचन आहे. येशूने ते त्याच्या मोठ्या युद्धामध्ये वापरले; तो म्हणाला, "असे लिहिले आहे...."

12 आणि या सकाळी जेव्हा मी ऐकत होतो, काही दिवसा अगोदर, एक प्रक्षेपण की ते असे सांगण्याची इच्छा करत असल्याचे भासत होते की निर्मिती अगदी काही राख एकत्र फुंकल्याने अस्तित्वात आली, आणि काही फॉस्फेट, आणि पृथ्वीवरील काही रसायने, आणि उबदार सूर्यप्रकाशाने जीवनाचा जंतू निर्माण केला आणि जीवन आणले.... किती हास्यास्पद, जेव्हा सूर्यप्रकाश या जीवनाच्या कोणत्याही जंतूला ठार करील. सूर्यप्रकाशात एक जंतू ठेवा, तो लागलीच त्याला ठार करील. आणि तेथे कोणती अशी गोष्ट नाही, परंतु सैतान ते माझ्यावर ठोसण्याचा प्रयत्न करत आहे.... आणि माझ्या लहानशा रिबेकाला मी या सकाळी शाळेत नेल्यानंतर, आणि परतताना मार्गावर परत मी रेडिओ सुरु केला; आणि मी विचार केला मी परत त्या गोष्टीत पडेन, तेव्हा मी तो अगदी बंद केला.

आणि जसा मी रस्त्यावर जात होतो, सैतान मला म्हणाला; तो म्हणाला, "तुला माहिती आहे की हा मनुष्य ज्याला तू येशू म्हणतोस तो फक्त एक मनुष्य होता, त्याच्या दिवसातील एक दिवस, जसा बिली ग्रॅहम किंवा ओरल रॉबर्ट्स सारखा. तो केवळ एक मनुष्य होता ज्याकडे ते काही लोक एकत्र त्याच्या भोवती जमू लागले आणि असे म्हणू लागले, 'तो एक महान मनुष्य आहे.' आणि थोड्या काळानंतर तो महान बनला, आणि मग तो त्यांच्यासाठी देव बनला. आणि आता, तो मेल्यापासून हे सर्व जगभर पसरले आहे, आणि बस एवढेच."

13 मी विचार केला, "तू कसा खोटारडा आहेस." आणि मग मी वळलो अगदी जेव्हा मी ग्रॅहम मार्ग पार करीत होतो; मी म्हणालो, "सैताना, तू जो माझ्या मानसिकतेशी बोलत आहेस, मला तुला काही गोष्टी विचारावयाच्या आहेत: तो कोण होता ज्याबद्दल इब्री संदेष्टे बोलत होते जो येईल? अभिषिक्त मसीहा कोण होता? त्या मनुष्यांवर काय होते ज्यांनी त्याला आगाऊ पाहिले होते आणि तो येथे येण्याअगोदर हजारो वर्षांपूर्वी त्याचे जीवन सांगितले होते? तो कोण होता ज्याने शब्दशः ते अगोदरच सांगितले होते? आणि जेव्हा तो आला, ते म्हणाले, 'तो अपराध्यात गणला गेला होता,' आणि तो गेला. 'तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला,' आणि तो झाला. 'त्याला धनवानाची कबर प्राप्त झाली, परंतु तो तिसऱ्या दिवशी उठेल,' आणि तो उठला. आणि मग त्याने पवित्र आत्म्याचे अभिवचन दिले; आणि तो मला मिळाला, तेव्हा तू अगदी बरे होईल माझ्यापासून निघून जावे; कारण वचनात लिहिले आहे, आणि प्रत्येक वचन सत्य आहे." मग तो निघून गेला. फक्त त्याला वचन द्या; ते तसे करते. तो ते वचन सहन करु शकत नाही, कारण ते प्रेरित आहे. आज रात्री आपण प्रेषितांच्या पुस्तकात सातव्या अध्यायात वाचण्यास सुरु करुया.

मग प्रमुख याजक म्हणाला, ह्या गोष्टी अशाच आहेत काय?

तेव्हा तो म्हणाला, बंधुजनहो, व लोकांनो, व वडिलांनो, ऐका; आपला पूर्वज अब्राहाम, हारान प्रांतात जाऊन राहण्यापूर्वी, मेसोपटेम्या देशात असता, गौरवशाली देवाने त्याला दर्शन देऊन म्हटले,

तू आपला देश, व आपले नातलग सोडून, मी तुला दाखवीन त्या देशात चल.

तेव्हा तो खास्द्यांच्या देशातून निघून, हारानात जाऊन राहिला: मग, त्याचा बाप मेल्यावर, देवाने त्याला तेथून काढून, सध्या तुम्ही राहता त्या देशात आणले.

पण त्यात त्याला वतन दिले नाही, पाऊलभर देखील जमीन दिली नाही: त्याला मुलबाळ नव्हते, तरी हा देश त्याला, व त्याच्यामागे त्याच्या संततीच्या, स्वाधीन कायमचा करण्याचे अभिवचन देवाने त्याला दिले.

...देवाने आणखी असे सांगितले, की त्याची संतती परदेशात जाऊन उपरी होईल; आणि ते लोक त्यांना दास करुन, चारशे वर्ष जाचतील.

ज्या राष्ट्रांच्या दास्यात ते असतील त्यांचे मी पारिपत्य करीन, असे देवाने सांगितले: आणि त्यानंतर ते तेथून निघून, माझी सेवा ह्या स्थळी करितील,

त्याने त्याला सुंतेचा करार लावून दिला: हा करार झाल्यानंतर अब्राहामाला इसहाक झाला, त्याची त्याने आठव्या दिवशी सुंता केली; मग इसहाकाला याकोब झाला; याकोबाला बारा कुलपती झाले.

14 या जागेवर, आपण विषय आणू इच्छितो (जो मी विचार करतो आजचा उल्लेखनीय विषय आहे): पवित्र आत्मा काय आहे? तो काय आहे? आणि आता, अशाप्रकारे ओळीत मी हा विषय घेतला त्याचे कारण: तुम्ही येऊ शकत नाही आणि पवित्र आत्मा प्राप्त करु शकत नाही, जोपर्यंत तुम्हाला ठाऊक नाही तो काय आहे. आणि जोपर्यंत तो तुम्हाला दिला गेला आहे, आणि तो तुमच्यासाठी आहे, याचा तुम्ही विश्वास करीत नाही, तुम्ही तो प्राप्त करु शकत नाही (जर तुम्हाला ठाऊक आहे तो काय आहे). आणि मग, तुम्हाला समजू शकत नाही तुम्हाला तो मिळाला आहे किंवा नाही, जोपर्यंत तुम्हाला समजेल की तो काय परिणाम आणतो. तेव्हा जर तुम्हाला ठाऊक आहे तो काय आहे, आणि तो कोणासाठी आहे, आणि जेव्हा तो येतो तो काय कृती करतो, मग तुम्हाला कळेल की तुम्हाला काय मिळाले आहे जेव्हा तुम्हाला तो मिळेल, पहा. तो अगदी ते कायम करील.

15 अगदी जसे मी आपल्या भाऊ जेफ्रीशी आज बोलत होतो. आणि तो म्हणाला, "मला आज रात्री सभेसाठी असायला आवडले असते, परंतु मी उद्या रात्री तेथे असेन." त्याला माहित नव्हते की सभा चालल्या होत्या, कारण आम्ही अगदी सरळ येथे घोषणा केली नव्हती. काही.... भाऊ लिओ आणि त्यांनी आपल्या काही मित्रांना लिहिले होते आणि शहरा बाहेरील, त्यांना सांगितले होते. बरे, कारण आपल्याकडे जागा नव्हती....

आता, मी म्हणालो, "भाऊ जेफ्री, जर तू मला तुझ्या तेलाच्या विहिरीतील एकीला सुरु करण्यासाठी मला खाली पाठविले, आणि मला त्याबद्दल काही एक ठाऊक नाही, मी कदाचित त्याचा स्फोट करीन. मी कदाचित चुकीची चावी फिरवीन किंवा चुकीची मोटर चालू करीन. मी ते करण्यापूर्वी मला ते कसे करावे हे माहिती असायला हवे." आणि त्याच प्रकारे पवित्र आत्मा प्राप्त करण्याचे आहे; तुम्ही कशासाठी येत आहात, आणि तो कसा प्राप्त करायचा, आणि तो काय आहे, तुम्हाला ते माहिती असायलाच हवे.

16 आता, पहिल्या जागी, पवित्र आत्म्याचे अभिवचन देण्यात आले आहे. आपण दहा आठवडे घेऊ शकतो आणि कधीही ... या विषयाच्या फक्त कडेला वगळू शकत नाही: पवित्र आत्मा काय आहे. परंतु पहिली गोष्ट, प्रत्येक रात्री फक्त एक रुपरेषा देण्याइतके मला याकडे यायचे आहे, मग येणाऱ्या रात्री पाहू जर तेथे काही प्रश्न असतील.

येथे किती जणांनी पवित्र आत्मा प्राप्त केलेला नाही, पवित्र आत्म्याद्वारे बाप्तिस्मा झालेला नाही, तुमचे हात वर करा. तुम्हाला ठाऊक आहे तुमचा नाही.... फक्त हाताकडे पहा.

आता, मला यावर बोलायचे आहे, पवित्र आत्मा एक चिन्ह आहे म्हणून, कारण तो एक चिन्ह आहे. आपल्याला जाणीव आहे की सर्व अभिवचने आपल्याला दिलेली आहेत याद्वारे.... अब्राहाम अभिवचनाचा पिता होता, कारण देवाने अब्राहामाला आणि त्याच्यानंतर त्याच्या संततीला अभिवचन दिले. अभिवचन अब्राहाम व त्याच्या संततीला दिले गेले. आणि हे चिन्ह कराराच्या लोकांना आहे.

17 आता, तेथे फक्त एक ख्रिस्ती व एक पवित्र आत्म्याने भरलेला ख्रिस्ती यामध्ये फार मोठा फरक आहे. आणि आता, आपण हे शास्त्रलेखातून घेणार आहोत आणि ते अगदी तंतोतंत शास्त्रलेखामध्ये मांडणार आहोत. पहिल्या जागी, तेथे एक ख्रिस्ती आहे, एक ख्रिस्ती आहे असा म्हटला गेलेला. परंतु जर हा ख्रिस्ती अजूनही पवित्र आत्म्याने भरला गेला नसेल, तो केवळ एक ख्रिस्ती होण्याच्या प्रक्रियेत आहे, पहा. तो ते विश्वास करण्याचे म्हणतो; त्यामध्ये तो कार्य करीत आहे, परंतु देवाने अजून ही त्याला ह्या पवित्र आत्म्यातील आत्मा दिलेला नाही. तो अजून ही देवाबरोबर त्या ध्येयाला पोहचला नाही, की देवाने ते ओळखले आहे.

18 कारण की देवाने अब्राहामाबरोबर एक करार केला त्याने अब्राहामाला पाचारण केल्यानंतर, जे आज विश्वासणाऱ्याला पाचारण करण्याचे प्रतीक आहे.... त्याने अब्राहामाला पाचारण केले, आणि अब्राहाम त्याच्या देशातून निघाला आणि एका अनोळखी भूमीत अनोळखी लोकांत राहण्यासाठी गेला. आणि ते एक प्रतीक होते जेव्हा देव मनुष्याला त्याचा क्षुद्रपणा थांबविण्यासाठी, त्याच्या पापांचा पश्चाताप करण्यासाठी बोलावितो. मग तो ज्या जमावामध्ये होता त्यापासून वळतो, एका नव्या जमावामध्ये वास करण्यासाठी, नव्या प्रकारच्या लोकांमध्ये. आणि मग, देवाला अब्राहाम अभिवचनासाठी विश्वासयोग्य आढळल्यानंतर जे देवाने त्याला दिले होते (की त्याला एक मूल होईल आणि या संतानाद्वारे सर्व पृथ्वी आशीर्वादित होईल), मग त्याला एक चिन्ह देण्याद्वारे देवाने त्याचा विश्वास कायम केला; आणि ते चिन्ह सुंता होती. आणि सुंता ही पवित्र आत्म्याचे प्रतीक आहे.

अगदी अक्षरशः पुढची पदे या अध्यायाची जी आपण आतच वाचली आहेत (जर तुम्हाला ते लिहून घ्यायचे असेल).... यामध्ये.... स्तेफन एक्कावन्नव्या पदामध्ये म्हणाला, "अहो ताठ मानेच्या, आणि हृदयाची व कानांची सुंता न झालेल्या लोकांनो, तुम्ही जर पवित्र आत्म्याला सर्वदा विरोध करता: जसे तुमचे पूर्वज, तसेच तुम्हीही."

19 सुंता ही पवित्र आत्म्याचे एक प्रतीक आहे. आणि देवाने अब्राहामाला सुंतेचे चिन्ह दिले त्याने देवाला त्याच्या अभिवचनावर स्वीकारल्यानंतर आणि अनोळखी देशात निघून गेल्यानंतर, पहा. ते एक चिन्ह होते. आणि त्याची सर्व संताने आणि त्याचे बीज त्यानंतर यांच्या देहामध्ये हे चिन्ह असावयास हवे, कारण तो एक भेद होता. ते त्यांना इतर सर्व लोकांपासून वेगळे करण्यासाठी, हे सुंतेचे चिन्ह होते. आणि तेच काय ते देव आज वापरतो. ते हृदयाच्या सुंतेचे चिन्ह आहे, पवित्र आत्मा, जो देवाच्या मंडळीला इतर पंथांपासून, विश्वासापासून, आणि संप्रदायांपासून एक वेगळी मंडळी करतो. ते सर्व प्रकारच्या संप्रदायांत आहेत, परंतु तरीही ते एक वेगळे लोक आहेत.

20 तुम्ही मला एका माणसाशी दोन मिनिटे बोलू द्या; मी तुम्हाला सांगू शकतो त्याने पवित्र आत्मा प्राप्त केला आहे किंवा नाही. तसेच तुम्ही सुद्धा. तो त्यांना वेगळे करतो; ती एक खूण आहे; ते एक चिन्ह आहे. आणि पवित्र आत्मा हे एक चिन्ह आहे. जुन्या करारात कोणतेही मूल ज्याने सुंतेला नाकारले, जे पवित्र आत्म्याचे पूर्वचित्रण होते, त्याचा लोकांमधून उच्छेद केला जात असे. तो इतर मंडळी बरोबर संगती करु शकत नव्हता जर त्याने सुंतेला नकार दिला असेल. आता आज त्याचा नमुना जोडा. एक व्यक्ती जो पवित्र आत्माचा बाप्तिस्मा घेण्याचे नाकारतो तो त्यांच्यामध्ये संगती करु शकत नाही जे पवित्र आत्म्याचे आहेत. तुम्ही अगदी ते करु शकत नाही. तुमच्याकडे एक स्वभाव असावयास हवा.

जसे, तेथे माझी आई म्हणत असे, "सारख्या पंखांचे पक्षी एकत्र थवा करतात." बरे, ती एक जुनी म्हण आहे, परंतु ती एक सत्य आहे. तुम्ही कबुतरांना आणि कावळ्यांना संगती करताना पाहत नाही. त्यांचा आहार वेगळा आहे; त्यांच्या सवयी वेगळ्या आहेत; त्यांच्या इच्छा वेगळ्या आहेत. आणि त्याच प्रकारे ते जगाबरोबर आणि एका ख्रिस्तीजनाबरोबर असते जेव्हा तुम्ही पवित्र आत्म्याद्वारे सुंता झालेले असता, ज्याचा अर्थ देहाला छाटून टाकणे आहे.

21 सुंता ही केवळ पुरुषामध्ये होऊ शकते. परंतु जर स्त्री ही पुरुषाशी विवाह झालेली असेल, ती त्याचा भाग होते; तिची त्याच्याबरोबर सुंता झाली आहे. तुम्हाला लक्षात आहे तीमथ्यामध्ये जेथे असे म्हटले आहे, "तथापि मर्यादेने विश्वासात व पवित्रतेत त्या राहिल्यास, बालकाला जन्म देण्याच्या योगे त्यांचे तारण होईल."

आता, सुंता.... तुम्हाला माहित आहे जेव्हा सारा पाठीमागे तंबूत दूताच्या संदेशावर हसली, जेव्हा तो म्हणाला, "अब्राहाम (तो कोण होता हे माहिती नसताना, एक अनोळखी), तुझी पत्नी, सारा कुठे आहे?" त्याला कसे माहिती की त्याला एक पत्नी होती.

जसे येशू म्हणाला, "जसे लोटाच्या दिवसात होते, तसेच मनुष्याच्या पुत्राच्या आगमना समयी असेल." लक्षात आहे, ती चिन्हे खाली सदोम व गमोरामध्ये, जगामध्ये धार्मिकांमध्ये दिली गेली नव्हती; परंतु ते निवडलेल्यांसाठी होते, बाहेर बोलाविलेल्यांसाठी होते. आणि अब्राहामाला पाचारण केले गेले होते. आणि मंडळी शब्द म्हणजे "बाहेर बोलाविलेले, वेगळे केलेले," जसे अब्राहामाने स्वतःला वेगळे केले होते आणि सुंता झालेला होता. आणि मग, जेव्हा सारा प्रत्यक्ष दूताच्या संदेशावर हसली, देवाने तिला अगदी त्याच जागी ठार केले असते; परंतु तो अब्राहामाला त्रास दिल्याशिवाय सारेला त्रास देऊ शकत नव्हता, कारण ते एक होते. ती त्याचा भाग होती. तुम्ही यापुढे दोघे नाहीत परंतु एक आहात.

22 तेव्हा सुंता, पवित्र आत्मा, आज हृदयाची सुंता करतो; आणि ते एक चिन्ह आहे, एक दिलेले चिन्ह. त्या दिवशी कोणीतरी म्हणाले.... मी फक्त हे पुन्हा उच्चारतो, एक विनोद म्हणून नाही, कारण ते एक सत्य आहे; परंतु ते एका विनोदाप्रमाणे भासते. जसे मी नियमित म्हणतो, "ही विनोद करण्याची जागा नाही." परंतु तेथे एक लहानसा जर्मन मनुष्य होता बाहेर पश्चिम किनाऱ्याला जेथे आम्ही आताच होतो. त्याने पवित्र आत्मा प्राप्त केला, आणि तो खाली रस्त्यावर गेला; आणि तो थोडासा चाले, आणि तो त्याचे हात वर करी आणि अन्यभाषेत बोले; आणि तो धावत असे, आणि तो उड्या मारी, आणि तो आरोळी मारी. आणि अशा प्रकारे वर्तन करीत तो कामावर होता, आणि त्याचा मालक त्याला म्हणाला, "तू कोठे जाऊन आलास?" (मला ती स्थळे आवडतात जेथे तू जाऊन येतो.) तो म्हणाला, "तू तेथे खाली त्या वेड्यांच्या जमावात जाऊन आलेला असावास."

तो म्हणाला, "मग तुम्ही विचार करता ते वेडे आहेत?"

तो म्हणाला, "निश्चित ते आहेत."

तो म्हणाला, "बरे, त्या वेड्यांसाठी परमेश्वराची स्तुती करतो!" आणि तो म्हणाला, "तुम्हाला माहिती आहे काय? ते खिळे मोठी कामगिरी पार पाडतात," तो म्हणाला, "उदाहरणार्थ, मोटार वाहन: तुम्ही त्यामधून सर्व खिळे बाहेर काढून टाका, तुमच्याकडे काही नाही परंतु भंगाराचा एक ढीग असेल.'" तेव्हा ते अगदी बरोबर आहे.

23 जेव्हा पवित्र आत्मा तुम्हावर येतो तुम्ही इतके वेगळे असता, की या जगाच्या लोकांना तुम्ही आवडत नाही, आणि ते तुमच्या विरोधात असतात, आणि त्यांना तुम्हाबरोबर अजिबात काही कर्तव्य नसते. तुम्ही दुसऱ्या जगात जन्म पावलेले असता; तुम्ही अगदी तितकेच फरके असता, जितके जर तुम्ही आफ्रिकेच्या जंगलात दुर्गम भागात गेलात, त्याच्या दहापट अधिक तुम्ही उपरी होता. जेव्हा पवित्र आत्मा येतो तुम्ही वेगळे बनता. आणि ते एक चिन्ह आहे. लोकांमध्ये ती एक खूण आहे.

आता, मग तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, ती सुंतेची खूण अब्राहाम (ते खरे आहे) आणि त्याच्या संतानाला दिली गेली होती." होय. ठीक आहे.

24 आता, आपण गलतीकरांस, तिसरा अध्याय, एकोणीसाव्या पदात वळणार आहोत आणि पाहू ते कसे काय आपल्याला लागू पडते. गलतीकरांस ३ आणि २९, आणि फक्त पहा ही सुंता कशी परराष्ट्रीयांना लागू पडते, जर आपण परराष्ट्रीय आहोत, जे नैसर्गिक जन्माद्वारे आपण आहोत. आता पहिली ... मला सोळावे पद वाचावयाचे आहे.

आता अब्राहामाला व त्याच्या संतानाला ती अभिवचने दिली होती. [अब्राहाम आणि त्याचे संतान.] तो म्हणाला नाही, आणि संतानांना [अगदी कोणत्याही प्रकारचे एक बीज. म्हणेल, "ओह, मी देखील अब्राहामाचा संतान आहे." नाही! एका संतानाला. अब्राहामाच्या संतानाला, संतानांना नाही.], पुष्कळजणा संबंधी; परंतु असे एका विषयी, आणि तुझ्या संतानाला, जो ख्रिस्त आहे.

ख्रिस्त अब्राहामाचा संतान होता. तुम्ही ते विश्वास करता? ठीक आहे. आता, आपण अठ्ठाविसावे आणि एकोणीसावे पद घेऊया.

यहुदी व हेल्लेणी, गुलाम व स्वतंत्र, पुरुष व स्त्री, हा भेदच नाही: कारण तुम्ही सर्वजण ख्रिस्त येशूच्या ठायी एकच आहात.

आणि तुम्ही जर ख्रिस्ताचे आहेत, तर अब्राहामाचे संतान, आणि अभिवचनाच्या द्वारे वारीस आहात.

आपण अब्राहामाचे संतान कसे होऊ शकतो? ख्रिस्तामध्ये असण्याद्वारे, मग आपण अब्राहामाचे संतान आहोत. आणि अब्राहामाचे संतान काय होते? जसे.... आपण रोमन ४ मध्ये आणि भिन्न ठिकाणी जाऊ शकतो. अब्राहामाला जेव्हा त्याची सुंता झाली होती तेव्हा कधीही अभिवचन मिळाले नाही. हे दाखविण्यासाठी की सुंता हे फक्त एक प्रतीक होते, त्याची सुंता होण्याअगोदर त्याला अभिवचन प्राप्त झाले. आणि ते त्याच्या विश्वासाच्या ओळखीचा जो त्याच्याकडे त्याची सुंता होण्याअगोदर होता, त्याचे एक प्रतीक होते.

25 आता, जेव्हा आपण ख्रिस्तात आहोत, आपण अब्राहामाचे संतान बनतो आणि ख्रिस्ताबरोबर वारीस आहोत; त्यामुळे, काही फरक पडत नाही आपण कोण आहोत, यहुदी किंवा परराष्ट्रीय.... आणि अब्राहामाचे संतान ... अब्राहामाच्या संतानाकडे अब्राहामाचा विश्वास आहे, जो देवाला त्याच्या वचनावर घेतो. पर्वा न करता की ते किती हास्यास्पद भासते, किती असाधारण तुम्ही वर्तन करता, ते तुम्हाला किती विलक्षण बनविते, कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता, तुम्ही देवाला त्याच्या वचनावर घेता.

अब्राहामाने वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षी आणि साराने वयाच्या पासष्टाव्या वर्षी देवाला त्याच्या वचनावर घेतले आणि त्याच्या विरोधात जे काही होते ते नसल्यासारखे गणले. तुम्ही काय विचार करता त्या दिवसातील वैद्यांनी काय विचार केला असेल? तुम्ही काय विचार करता त्या लोकांनी विचार केला असेल जेव्हा त्यांनी पंच्याहत्तर वर्षे वयाच्या वृद्ध माणसाला सभोवती जाऊन त्याला त्याच्या पत्नीद्वारे एक बाळ होणार आहे त्याबद्दल देवाची प्रशंसा करताना पाहिले, आणि ती पासष्ट वर्षे वयाची होती, सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी रजोनिवृत्ती झाली होती? परंतु (तुम्ही पहा)

ते तुम्हाला विचित्र वर्तन करायला लाविते, अब्राहामाचा विश्वास.

26 आणि जेव्हा तुमची पवित्र आत्म्याने सुंता होते, ती तुम्हाला तीच गोष्ट करते. ती तुम्हाला गोष्टी करावयास लाविते ज्या तुम्ही विचार केला नसेल की तुम्ही कराल. ती तुम्हाला देवाचे अभिवचन घ्यावयास लाविते आणि देवावर विश्वास करावयास लाविते.

आता, ते देखील.... एका अभिवचना व्यतिरिक्त आणि एक चिन्हा व्यतिरिक्त, तो एक शिक्का देखील आहे. आता, जर तुम्ही माझ्याबरोबर रोमकरांसमध्ये जाल.... प्रथम, मला हवे आहे की तुम्ही माझ्याबरोबर इफिसकरांस ४:३० मध्ये जाल, आणि येथे अगदी एक मिनिट वाचूया. इफिसकरांस ४:३० म्हणते हे.... आता, तुम्ही कित्येक लोकांना भिन्न गोष्टींना शिक्का म्हणताना ऐकले आहे. "जर तुम्ही मंडळीत जाल, तुमच्याकडे मंडळीचा शिक्का असतो." आणि काही लोक म्हणतात तो एक विशिष्ट दिवसाचे, एक शब्बाथ दिवस, पालन करणे आहे: "तो तो देवाचा शिक्का आहे." त्यातील काही म्हणतात, "जर आपण आपली सदस्यता एका विशिष्ट संप्रदायात ठेवली, आपण देवाच्या राज्यात मुद्रित झाले आहोत." आता, पवित्रशास्त्र म्हणते, "प्रत्येक मनुष्याचा शब्द खोटा ठरो आणि देवाचा सत्य असो."

27 आता इफिसकरांस ४:३० अशा प्रकारे वाचले जाते: देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करु नका, ज्याद्वारे मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही मुद्रित झाला आहात.

मला यावर आता थोडेसे कठोर व्हावे लागणार आहे आता. ते खाली ठेवूया.... आता, तुम्ही कायदेपंडित बंधुजन, अगदी थोड्या वेळाकरिता फक्त शांत रहा. तुम्ही लक्ष दिले किती काळ तो शिक्का टिकतो? पुढच्या संजीवनापर्यंत नाही, पुढच्या वेळी काहीतरी चुकीचे होते तोपर्यंत नाही, "तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत!" तेवढ्या वेळापुरता काय ते तुम्ही मुद्रित झाले आहात, तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत, जेव्हा देवाबरोबर असण्यासाठी तुम्ही उद्धारलेले आहात, तेवढ्या वेळापर्यंत पवित्र आत्मा तुम्हाला मुद्रित करतो. एका संजीवनापासून दुसऱ्या संजीवनापर्यंत नाही, परंतु अनंतापासून ते अनंतापर्यंत तुम्ही पवित्र आत्म्याद्वारे मुद्रित झालेले आहात. तोच काय तो पवित्र आत्मा आहे; तो देवाचा एक शिक्का आहे, की त्याला मिळाले आहे ... तुम्हाला त्याच्या नजरेत कृपा प्राप्त झाली आहे, आणि तो तुम्हाला प्रेम करतो, आणि तो तुमचा विश्वास करतो, आणि त्याने त्याचा शिक्का तुम्हावर ठेवला आहे. तो शिक्का काय आहे? कोणीतरी.... का, एक शिक्का नियुक्त किंवा म्हणजे "एक पूर्ण झालेले कार्य." आमेन! देवाने तुम्हाला वाचविले आहे, तुम्हाला पवित्र केले आहे, तुम्हाला शुद्ध केले आहे, तुमच्यावर कृपा केली आहे, आणि तुम्हाला मुद्रित केले आहे! त्याने पूर्ण केले आहे! तुमच्या उद्धाराच्या दिवसापर्यंत तुम्ही त्याचे उत्पादन आहात. एक शिक्का मारलेली गोष्ट ही पूर्ण झालेली गोष्ट असते.

पवित्र आत्मा काय आहे? ते एक चिन्ह आहे. आपण त्यावर थोडेसे नंतर दुसऱ्या संदेशात पाहणार आहोत, ते चिन्ह ज्याबद्दल पौल बोलला; अन्यभाषा हे एक विश्वासूंसाठी ... किंवा, अविश्वासूंसाठी एक चिन्ह होते.

28 आता, लक्ष द्या, परंतु यामध्ये, पवित्र आत्मा एक चिन्ह आहे ... मला म्हणायचे आहे, आणि पवित्र आत्मा एक शिक्का आहे. ते एक चिन्ह आहे जे देवाने त्याच्या निवडलेल्या लेकरांना दिले आहे. त्याला नाकारणे हे लोकांपासून उच्छेद पावणे आहे; आणि त्याला स्वीकारणे हे जगाबरोबर आणि जगातील सर्व गोष्टींबरोबर संपुष्टात येणे आहे, आणि एक उत्पादन होणे ज्यावर देवाने मान्यतेचा शिक्का मारला आहे.

मी हॅरी वॉटरबेरीबरोबर रेल्वेमार्गावर नोकरी करीत असे. आणि आम्ही डब्बे लादण्यासाठी खाली जात असू. माझा भाऊ, "डॉक," तेथे मागे उभा आहे, डब्बे भरण्यास मदत करतो. जेव्हा डब्बे लादण्याचे काम असते, ते त्या डब्यातून जातात (तो परीक्षक); आणि जर त्याला काहीही सैल आढळते जेथे ते पडू शकते आणि मोडू शकते, किंवा काहीही जे नाश करील.... तो त्या डब्याला तोपर्यंत शिक्का मारणार नाही जोपर्यंत तो डब्बा पूर्णपणे भरत नाही, जोपर्यंत तो गच्च भरला जात नाही, आणि व्यवस्थित अनुक्रमात असत नाही, की प्रवासाचा हादरा त्या उत्पादनाला इजा करीत नाही जे आतमध्ये आहे.

29 तीच काय ती बाब आहे आपण इतके शिक्का मारले जात नाही; आपण गोष्टींबद्दल खूपच सैल आहोत. जेव्हा परीक्षक तुमचे जीवन तपासण्यासाठी आत जातो हे पाहण्यासाठी की जर तुम्ही अगदी थोडेसे सैल नाहीत गोष्टींबद्दल, तुमच्या प्रार्थनामय जीवनाबद्दल थोडेसे सैल, तुमच्या रागाबद्दल थोडेसे सैल, त्या जीभेबद्दल थोडेसे सैल इतरांबद्दल बोलण्यासाठी; तो कधीही डब्याला शिक्का मारणार नाही. काही घाणेरड्या सवयी, काही लाजिरवाण्या गोष्टी, काही अश्लील मन, तो डब्बा मुद्रित करु शकत नाही. परंतु जेव्हा त्याला सर्वकाही त्याच्या जागेवर आढळते (तो परीक्षक), मग तो त्याला शिक्का मारतो. जेथे जाण्यासाठी तो डब्बा शिक्का मारला गेला आहे त्याच्या गंतव्य स्थानापर्यंत जाईपर्यंत तो उघडण्याचा कोणी हिंमत करु शकत नाही. तेथे ते आहे. "माझ्या अभिषिक्ताला कोणी स्पर्श करु नका; माझ्या संदेष्ट्यांना इजा करु नका. कारण मी तुम्हाला सांगतो, त्याने त्या लहानातील एकाला अगदी जे मुद्रित झालेले आहेत त्यांना अडखळण करण्याचा प्रयत्न करणे किंवा थोडेसे डळमळीत करावे यापेक्षा त्याच्या गळ्यात मोठ्या जात्याची तळी बांधून, त्याला समुद्रात टाकावे ह्यात त्याचे हित आहे." तुम्ही पहा त्याला काय म्हणायचे आहे?

30 तोच काय तो पवित्र आत्मा आहे. ते तुमचे आश्वासन आहे; ती तुमची सुरक्षितता आहे; तो तुमचा साक्षीदार आहे; तो तुमचा शिक्का आहे; ते तुमचे चिन्ह आहे की "मी स्वर्ग बद्ध आहे!" पर्वा करीत नाही सैतान काय म्हणतो, मी स्वर्ग बद्ध आहे. का? त्याने मला शिक्का मारला; त्याने तो मला दिला. त्याने मला त्याच्या राज्यामध्ये मुद्रित केले आहे, आणि मी गौरवात बांधलेला आहे! वारे वाहू द्या; सैतानाला जे त्याला करायचे ते करु द्या; देवाने मला माझ्या उद्धाराच्या दिवसापर्यंत मुद्रित केले आहे. आमेन! तोच काय तो पवित्र आत्मा आहे. ओह, तुम्हाला तो हवा आहे; मी त्याच्याशिवाय पुढे जाऊ शकलो नसतो. कितीतरी तेथे सांगितले जाऊ शकत होते, परंतु मी निश्चित आहे तुम्हाला ठाऊक आहे मी कशासंबंधी बोलत आहे.

31 आता, आपण फक्त एका मिनिटासाठी योहान १४ मध्ये, देखील, वळूया. मी अगदी वचनावर प्रेम करतो; ते सत्य आहे. आता, देवाचा आत्मा, पवित्र आत्मा.... पवित्र आत्मा काय आहे? तो ख्रिस्ताचा आत्मा तुमच्यामध्ये आहे.

आता, आपण वाचण्याअगोदर, मला अगदी येथे थोडेसे टिपणीचे शब्द बोलायला आवडेल. पवित्र आत्मा काय आहे? तो एक शिक्का आहे. पवित्र आत्मा काय आहे? तो एक करार आहे. पवित्र आत्मा काय आहे? ते एक चिन्ह आहे. मग पवित्र आत्मा काय आहे? तो येशू ख्रिस्ताचा आत्मा तुम्हांमध्ये आहे. "पहा अजून थोडा वेळ," येशू म्हणाला, "आणखी जग मला पाहणार नाही, परंतु तुम्ही मला पाहाल; कारण मी तुम्हाबरोबर असेन, अगदी जगाच्या अंतापर्यंत तुम्हांमध्ये असेन."

32 देवाचा आत्मा त्याच्या मंडळीत, कशासाठी आहे? त्याने ते कशासाठी केले? हे थोडेसे उद्या रात्रीच्या विषयावर आहे, परंतु त्याने ते कशासाठी केले? का त्याने.... का पवित्र आत्म्याने.... तो कशासाठी आला? तुमच्यामध्ये तो कशासाठी आला? तो माझ्यामध्ये कशासाठी आला? देवाची कार्ये सुरु ठेवण्याकरिता आला होता.

"मी नेहमी तेच करतो जे माझ्या पित्याला आवडते. मी माझी स्वतःची इच्छा पूर्ण करण्यास आलो नाही, परंतु पित्याची ज्याने मला पाठविले; आणि पिता ज्याने मला पाठविले तो माझ्याबरोबर आहे. आणि जसे माझ्या पित्याने मला पाठविले आहे, तसे मी तुम्हाला पाठवितो." ओह, माझ्या! पित्याने त्याला पाठविले, त्याच्यामध्ये गेला. पिता ज्याने येशूला पाठविले त्याच्यामध्ये आला, त्याच्याद्वारे कार्य केले. येशू जो तुम्हाला पाठवितो तुम्हाबरोबर जातो आणि तुम्हामध्ये असतो. आणि जर तो आत्मा येशू ख्रिस्तामध्ये राहत होता, त्याला अशाप्रकारे करण्यास व वर्तण्यास लाविले जसे त्याने केले, तुम्हाला काही सामान्य कल्पना असेल तो कसे करील जेव्हा तो तुम्हामध्ये असेल; कारण ते जीवन बदलू शकत नाही. तो शरीरातून शरीराकडे जाईल, परंतु तो त्याचा स्वभाव बदलू शकत नाही, कारण तो देव आहे.

33 आता, योहान १४ मध्ये, फक्त आपण अगदी थोडेसे वाचूया, दहाव्या पदापासून सुरुवात करु:

मी पित्यामध्ये, व पिता माझ्यामध्ये आहे ... असा विश्वास तू धरीत नाहीस काय? ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगतो त्या मी आपल्या मनाच्या सांगत नाही: माझ्यामध्ये राहणारा पिता, स्वतःची कार्ये करतो. (त्याचा विचार करा. आता.)

मी पित्यामध्ये, व पिता माझ्यामध्ये आहे हे माझे तुम्ही खरे माना: नाहीतर माझ्या कृत्यांमुळे तरी माझे खरे माना.

मी तुम्हाला, खचित, खचित सांगतो, मी जी कृत्ये करितो, ती माझ्यावर विश्वास ठेवणाराही ... करील; आणि त्यापेक्षा मोठी करील; कारण मी पित्याकडे जातो.

तुम्ही पाहत नाही? पहा कसे तेथे तो म्हणाला? आता पहा अगदी कसे हे बाहेर येते. मी अगदी थोडेसे पुढे वाचीन. आपण जवळ जवळ विसाव्या पदापर्यंत खाली वाचणार आहोत.

आणि जे काही तुम्ही मागाल ... (पाहूया, माझ्याकडे ... होय! उह हू!)

आणि पुत्राच्या ठायी पित्याचे गौरव व्हावे म्हणून, तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल, तर मी ते करीन.

जर तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल, मी ते करीन.

जर तुम्ही माझ्यावर प्रीती करता, माझ्या आज्ञा पाळा.

आणि मी पित्याला प्रार्थना करीन, [आता पहा!] आणि तो तुम्हाला दुसरा कैवारी, म्हणजे सत्याचा आत्मा देईल, की त्याने तुम्हाबरोबर सदासर्वदा राहावे;

जग त्याला ग्रहण करु शकत नाही, कारण ते त्याला पाहत नाही, अथवा त्याला ओळखीत नाही: तुम्ही त्याला ओळखता; कारण तो तुम्हाबरोबर राहतो, व तुम्हामध्ये वस्ती करतो.

34 मग तो आत्मा कोण आहे? पवित्र आत्मा काय आहे? तो तुम्हामध्ये ख्रिस्त आहे; कैवारी, तोच तो पवित्र आत्मा आहे. "आणि जेव्हा तो कैवारी येईल, तो तीच कार्ये करील जी मी केली जेव्हा कैवारी माझ्यामध्ये आहे. मी पित्याला प्रार्थना करीन, आणि तो तुम्हाला हा कैवारी देईल. तुम्हाला तो कैवारी ठाऊक आहे; जग त्याला ओळखीत नाही (कधी ओळखणार नाही), परंतु तुम्ही त्याला ओळखता कारण आता तो तुम्हाबरोबर राहतो (येशू बोलत आहे), परंतु तो तुम्हामध्ये असेल." तुम्ही तेथे आहात; तो कैवारी आहे.

...तुम्हामध्ये वस्ती करील. मी तुम्हाला अनाथ असे सोडणार नाही: मी तुम्हाकडे येईन. [मी तुम्हाला नाही.... आता, तो तो कैवारी आहे, ख्रिस्त. तोच काय तो पवित्र आत्मा आहे; तो ख्रिस्त आहे.]

आता थोडाच वेळ आहे, मग जग मला आणखी पाहणार नाही; पण तुम्ही मला पाहाल: मी जिवंत आहे म्हणून, तुम्हीही ... जिवंत राहाल.

ओह, आपण पुढे आणि पुढे जाऊ शकतो, परंतु तुम्हाला समजो... तो काय आहे? तो एक शिक्का आहे; तो एक चिन्ह आहे; तो एक कैवारी आहे. पहा तो सर्व काय आहे? अब्राहामाचे संतान त्याचे वारीस आहेत.

35 आता, आपण हे ही शोधूया की तो कैवारी अजून काय आहे. आपण १ योहान १६:७ मध्ये जाऊया; पाहू जर तो एक वकील देखील

नाही. तुम्हाला ठाऊक आहे काय एक वकील असतो. वकिली करतो. आपल्याकडे एक वकील आहे; आपल्याला ते ठाऊक आहे. १ योहान सोळावा अध्याय.... ओह, एक मिनिट थांबा; मला क्षमा करा. संत योहान आहे ते, १६:७. मला क्षमा करा; मला निश्चित वाईट वाटते मी तसे म्हणालो; मी ते चुकीचे वाचले ... माझ्याकडे १६:७ आहे.

तरी मी तुम्हाला खरे ते सांगतो; मी जावे हे तुमच्या हिताचे आहे; कारण मी न गेलो, तर कैवारी तुमच्याकडे येणारच नाही; मी गेलो, तर त्याला तुमच्याकडे पाठवीन.

तो येऊन, पापाविषयी, व नीतिमत्वाविषयी, व न्यायनिवाड्या विषयी जगाची खात्री करील:

ते माझ्यावर विश्वास ठेवीत नाहीत, ह्यावरुन पापाविषयी;

मी पित्याकडे जातो, आणि ह्या नंतर तुम्हाला मी दिसणार नाही, ह्यावरुन नीतिमत्वाविषयी;

आणि ह्या जगाच्या अधिपतीचा न्याय झाला आहे, ह्यावरुन न्यायनिवाड्याविषयी.

36 माझ्या! आता, तो वकील १ योहान २:१२ मध्ये आढळतो.... आता, आपण ते आता अगदी एक मिनिट वाचूया, १ योहान २:१२. मी तुमची क्षमा मागतो, १ योहान १ आणि २, ते आहे. मी हे खाली लिहून ठेवले आहे, १ योहान २:१-२.

माझ्या लहान मुलांनो, तुम्ही पाप करु नये, म्हणून हे मी तुम्हास लिहितो. जर कोणी पाप केले, तर नीतिसंपन्न असा जो येशू ख्रिस्त, तो पित्याजवळ आपला वकील आहे: [कोण वकील आहे? नीतिसंपन्न, येशू ख्रिस्त.]

आणि तोच आपल्या पापाबद्दल प्रायश्चित्त आहे: आणि केवळ आपल्याच पापाबद्दल नव्हे, तर सर्व जगाच्याही पापाबद्दल आहे.

पवित्र आत्मा काय आहे? तो एक वकील आहे. एक वकील काय आहे? तो काय करतो, वकिली करतो? त्याच्याकडे दया आहे; तो तुमच्या जागेवर उभा राहतो; तो त्या गोष्टी करतो ज्या तुम्ही करु शकत नाही; तो तुमच्या पापांसाठी प्रायश्चित्त आहे. तो तुमचे नीतिमत्व आहे; तो तुमचे आरोग्य आहे; तो तुमचे जीवन आहे; तो तुमचे पुनरुत्थान आहे; तो ते सर्वकाही आहे जे देवाने तुमच्यासाठी ठेवले आहे! तो एक वकील आहे.

37 कसे आपण त्याच्या तपशिलात जाऊ शकतो आणि त्याची फोड करु शकतो, की कसा तो जेव्हा आपल्या अज्ञानासाठी मध्यस्थी करतो. कधीतरी जेव्हा आपल्याला पवित्र आत्मा मिळतो, आपण अज्ञानाने कशामध्ये तरी डळमळतो. तेथे पवित्र आत्मा आपल्यासाठी वकिली करतो. तो आपला वकील आहे. तो तेथे उभा राहतो; तो आपला प्रतिनिधी आहे. तो तेथे उभा राहून, आपल्यासाठी याचना करतो. आपण स्वतःहून आपल्यासाठी याचना करीत नाही, कारण आपल्यामध्ये पवित्र आत्मा आहे जो आपल्यासाठी याचना करतो. पवित्र आत्मा उच्चार देतो, कधी कधी अशा शब्दांनी जे तुम्ही समजू शकत नाही, आणि तो आपल्यासाठी मध्यस्थी करतो. तोच काय तो पवित्र आत्मा आहे.

जेव्हा मी कशामध्ये ही चालतो, मी एका लहान बालकासारखा चालतो; तुम्ही एका लहान मनुष्यासारखे चालता. आपण शत्रूंनी भरलेल्या, पापाने भरलेल्या, सापळ्यांनी भरलेल्या, सर्वकाहीनी भरलेल्या, अंधकारमय जगात चालत आहोत. तुम्ही म्हणता, "ओह, मी भितो, ख्रिस्ती जीवन घेण्यासाठी मी भितो. मी हे करण्यासाठी घाबरतो. मी घाबरतो मी हे करीन." घाबरु नका. आपल्याकडे एक वकील आहे! आमेन! ओह, तो आपल्या बाजूला उभा राहतो; तो आपल्यामध्ये आहे, आणि तो आपल्यासाठी मध्यस्थी करतो. पवित्र आत्मा नियमितपणे, नियमितपणे सर्वदा आपल्यासाठी वकिली करतो.

तो आपला वकील आहे (ओह, कसा आपण त्यासाठी देवाला धन्यवाद देतो), एक शिक्का, एक चिन्ह, जीवनाचा आत्मा, स्वर्गाचा देव, कैवारी, जीवन, वकील. तो काय आहे? ओह, माझ्या! आपण तासंतास त्याबरोबर पुढे जाऊ शकतो. आता, आपण एका मिनिटांकरिता अगदी बदलणार आहोत.

38 आता, आपण आता विचारणार आहोत.... शेवटच्या दिवसात आपल्याला अभिवचन दिले गेले आहे.... हा वकील, शिक्का, अभिवचन, सर्वकाही ज्याबद्दल आपण आज रात्री बोललो आहोत - दहा हजार वेळा अधिक - त्याने आपल्याला या शेवटच्या दिवसात अभिवचन दिले आहे. त्या दिवसात त्यांच्याकडे ते नव्हते; त्यांच्याकडे फक्त त्यांच्या शरीरात एक चिन्ह आणि एक खूण म्हणून शिक्का होता, विश्वास करील की तो येत होता. आणि ते नियमाच्या सावलीद्वारे चालले, जे ते शरीराद्वारे सुंता झालेले होते.

आज आपण नियमाच्या सावलीद्वारे चालत नाहीत; आपण पुनरुत्थानाच्या सामर्थ्याद्वारे चालत आहोत. आपण आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे चालत आहोत जो आपला खरा शिक्का आहे, आपला खरा वकील, आपला खरा कैवारी, आपले खरे चिन्ह की आपण वरुन जन्म पावलेलो आहोत, असाधारण, विचित्र लोक, चमत्कारिक वर्तन करणारे, देवाला त्याच्या वचनावर घेणारे, इतर सर्वकाही चुकीचे बोलणारे. देवाचे वचन बरोबर आहे. ओह, माझ्या! तोच काय तो पवित्र आत्मा आहे.

39 तुम्हाला तो हवा आहे? तुम्हाला तो घेण्यास आवडणार नाही का? पाहूया आपण जर त्याचे अभिवचन दिले गेले होते. आता, आपण मागे यशया मध्ये जाऊया, यशयाच्या पुस्तकात. यशयाचा अठ्ठाविसावा अध्याय काढूया. आता, आपण यशया २८ मध्ये जात आहोत, आणि आपण सुरु करीत आहोत सुमारे.... आपण आठवे पद घेऊया. पाहूया तो येण्याच्या ७१२ वर्षाअगोदर यशया काय म्हणाला. आपण याबद्दल खूप काही म्हणू शकतो, मागे जा, पूर्णपणे मागे; परंतु आपण फक्त सरळ येथे सुरु करु आणि पाहू जर मंडळीला त्याचे अभिवचन दिले गेले होते.

कोणत्या दिवशी तो यायला पाहिजे? शेवटच्या दिवसात जेव्हा तेथे भ्रष्टता असेल. आता लक्षात ठेवा, तो शब्द अनेकवचनी आहे - दिवसांत - शेवटचे दोन दिवस, ती शेवटची दोन हजार वर्षे. आता, आता, आठवे पद:

सर्व मेजे ... घाणीने भरली आहेत, निर्मळ जागाच उरली नाही.

ती शोधण्यासाठी सभोवार आज धुंडाळा. सभोवती पहा आणि बघा जर आपण त्या दिवसात नाहीत. सर्व मेजे.... का ते प्रभू भोजाला जातात, आणि पहिली गोष्ट सामग्रीमध्ये, जुना स्वस्त पावाचा तुकडा घेतात, किंवा खारी बिस्किटे, आणि ती तोडतात आणि प्रभुभोज घेतात, जेव्हा ते खरंतर पवित्र आत्म्याच्या हातांनी आणि बेखमीर भाकरीने तयार करणे असते. ख्रिस्त घाणेरडा आणि गलिच्छ नाही, आणि ते त्याला दर्शविते.

दुसरी गोष्ट ते त्या लोकांना देतात जे मद्यपान करतात, खोटे बोलतात, चोरी करतात, धूम्रपान करतात, चघळतात, अगदी काहीही, जोपर्यंत ते मंडळीच्या मालकीचे आहेत. तसे न घडो! जर एक मनुष्य कधी ते घेतो जेव्हा आपण येथे खातो, तो स्वतः दोषाचा श्वास घेतो व पितो, परमेश्वराच्या शरीराचे मर्म न ओळखल्याने. जर तो जीवन जगत नाही, त्यापासून दूर रहा. आणि जर तुम्ही ते घेत नाही, ते दाखविते की तुमचा विवेक अपराधी आहे. "तो जो खात नाही, त्याला माझ्यामध्ये भाग नाही," येशू म्हणाला,

40 परंतु परमेश्वराची सर्व मेजे घाणीने भरली आहेत. तेथे एक ही स्वच्छ जागा नाही.

ऐका, जर ते आजचे चित्र नाही.

कोणाला तो ज्ञान शिकविल? आणि कोणाला तो शिकवण समजावील?

कोणाला तो ज्ञान समजावील? कोणाला तो शिकवण समजावील?

"बरे, देव धन्य असो, मी प्रेसबायटेरियन आहे!"

"मी मेथडिस्ट आहे!"

"मी पेन्टिकॉस्टल आहे!"

"मी नाजरीन आहे!"

"मी पिलग्रिम होलीनेस आहे! त्याचा अर्थ देवाला एकही गोष्ट नाही; अगदी दुसरे मेज.

41 "मी कोणाला शिकवण समजावून सांगू?" कोणत्या प्रकारची शिकवण? मेथडिस्ट, बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, पेन्टिकॉस्टल? पवित्रशास्त्राची शिकवण. "मी कोणाला शिकवण समजावून सांगू?"

तुम्हाला कसे कळेल तुम्हाला तो मिळाला आहे? आपण शुक्रवारी रात्री त्यामध्ये जाणार आहोत, पहा.

"मी कोणाला शिकवण समजावून देऊ?" आता पहा.

...त्यांना ज्यांचे दूध तुटलेले आहे, आणि थानतुट्या बालकांस.

लहान बालके म्हणतात, "बरे, मी मंडळीत जातो. माझी आई या मंडळीच्या मालकीची होती." मला त्याच्या विरुद्ध काही नाही, प्रिय भावा. (आणि मला जाणीव आहे हे ध्वनिमुद्रित केले जात आहे.) ते ठीक आहे, आईच्या मंडळीच्या मालकीचा असणे. परंतु ऐका! आई एका प्रकाशात चालली; तू दुसऱ्या प्रकाशात चालत आहे.

लुथर एका प्रकाशात चालला; वेस्ली दुसऱ्या प्रकाशात चालला. वेस्ली एका प्रकाशात चालला; पेन्टिकॉस्ट दुसऱ्यात चालले. परंतु आज आपण त्यापेक्षा वरच्या प्रकाशात चालत आहोत. आणि जर तेथे दुसरी पिढी असेल, ती आपल्या पलीकडे जाईल.

42 असे प्रारंभीच्या दिवसात मागे जेव्हा गोष्ट रुंद होती, रुंद रस्त्याने, लूथरने विश्वासाद्वारे नीतिमान ठरणे शिकविले. ते फक्त लोकांना कॅथोलिक वादातून प्रोटेस्टंटवादात आणणे होते, वचनाभोवती संगती करण्यासाठी. विश्वासाद्वारे नीतिमान ठरणे, तो एक मोठा रुंद गोल होता; ते कधीच तेथून हटले नाहीत.

त्या सोबतच दुसरे संजीवन आले जॉन वेस्ली नावाचे. त्याने त्यांना खाली त्यापासून हादरविले, आणि तिला खाली पवित्रीकरणामध्ये आणले: एक चांगले, स्वच्छ, पवित्र जीवन जगणे, देवाच्या वचनाद्वारे पवित्रीकरण, तुमच्या हृदयात हर्ष देतो. त्याने लूथरनच्या कित्येक शिकवणी झटकून टाकल्या.

43 मग सोबत पेन्टिकॉस्ट पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याद्वारे आले आणि पवित्र आत्मा स्वीकारण्याद्वारे परत त्याला संकुचित केले. ते बरोबर आहे. आणि आता, ते कोसळण्यास सुरुवात झाली आहे. आणि दाने, आणि पुनःस्थापना, आणि देवाचा आत्मा आत आला आहे, मंडळीमध्ये चिन्हे आणि अद्भुतांच्या पूर्णतेत आणि पेन्टिकॉस्टला हादरविले आहे. ते काय आहे? आपण प्रभू येशूच्या आगमनाच्या इतके निकट आहोत, की प्रत्यक्ष तो आत्मा जो त्याच्यामध्ये होता तो मंडळीमध्ये कार्य करीत आहे, त्याच गोष्टी करीत आहे ज्या त्याने केल्या जेव्हा तो येथे पृथ्वीवर होता. ते अजून कुठेही नव्हते, मागे प्रेषितांच्या वेळेपासून ते या समयापर्यंत. का? पहा, ते रुंद आहे, अरुंद, अरुंद, अरुंद होत जाते. ते काय आहे?

अगदी जसा तुमचा हात सावलीकडे येत आहे, नकारात्मक, नकारात्मक, नकारात्मक. बरे, ते काय आहे? ते एक प्रतिबिंब आहे. लुथर काय होता? ख्रिस्ताचे प्रतिबिंब. वेस्ली काय होता? ख्रिस्ताचे एक प्रतिबिंब.

पहा! बिली संडेचे युग आताच संपले. त्या दिवशी, वृद्ध डॉक्टर व्हिटनी (त्याने सरळ येथे या उपदेशमंचावर शिकविले आहे), त्या जुन्या शाळेतील शेवटचा एक, सुमारे नव्वदला मेला, मी अंदाज करतो. बिली संडे हा एक त्याच्या दिवसातील नामधारी मंडळ्यांसाठी एक संजीवनवादी होता. तो कोणाची भीडमुर्वत राखीत नसे; तेथे उभा राही आणि ओरडे, "तुम्ही सर्व मेथडिस्ट, भुशाच्या वाटेवर पडा, प्रचारक आणि सर्व. तुम्ही सर्व बॅप्टीस्ट, भुशाच्या वाटेवर पडा. तुम्ही प्रेसबायटेरियन...." त्याने कोणाची भीडमुर्वत राखली नाही. तो या दिवसातील बिली ग्रॅहम होता.

44 लक्ष द्या, आणि मग त्याच समयाला त्या नामधारी मंडळीचे संजीवन होते, काय घडले? संपूर्ण सुवार्तेचे संजीवन होते. तेथे बोसवर्थ भाऊ, स्मिथ विगल्सवर्थ, आणि डॉक्टर प्राईस, ऐमी मॅकफर्सन, ते सर्व. पहा! स्मिथ विगल्सवर्थ एके रात्री मरण पावला, डॉक्टर प्राईस दुसऱ्या सकाळी मरण पावले. चोवीस तासाच्या आत, मी कार्यक्षेत्रात होतो. आता, माझा अंत येत आहे.

याकडे पहा. तुम्ही बिली ग्रॅहमबद्दल फारसे ऐकत नाही; तुम्ही ओरल रॉबर्ट्सबद्दल फारसे ऐकत नाही. मी माझ्या सभा अंधुक होताना पाहतो. काय बाब आहे? आपण अंतामध्ये आहोत, दुसरे युग.

कसा काय बिली संडे, आणि ते आत आले? ते अगदी महान मुडी संजीवनानंतर आत आले. मुडी केव्हा आत आला? अगदी नॉक्स संजीवनानंतर. नॉक्स केव्हा आत आला? अगदी फिनीच्या संजीवनानंतर. फिनी कॅल्विननंतर, कॅल्विन वेस्लीनंतर, आणि वेस्ली लूथरनंतर, आणि युगातून खालून ते आले. जसे एक संजीवन संपते, देव दुसरे उभारतो, अधिक प्रकाश टाकतो, अगदी अशाप्रकारे फिरत राहते.

45 आता, आपण या समयाच्या अंतावर आहोत. ख्रिस्ताच्या आगमनासाठी प्रत्येक मनुष्याने त्याच्या मार्गाच्या शेवटाला पाहिले आहे. परंतु त्यांना पुढे फार काही पाहणे होते: यहुद्यांचे परतणे, आकाशात उडत्या तबकड्या, त्या सर्व गोष्टी ज्या आज आपण पाहतो. परंतु आपण शेवटास आहोत. आता आपण येथे आहोत!

त्यांना ठाऊक होते मंडळीला सामर्थ्य प्राप्त करणे होते जे मंडळीत कार्य करील तीच ख्रिस्ताची कृत्ये, कारण जशी सावली गडद आणि गडद होत जाते आणि अधिक प्रतिबिंबित करते.... तुम्ही एक छाया घ्या; छायेपासून दूर जा, तुम्हाला छायेचे कमी प्रतिबिंब मिळेल. थोड्या वेळाने छाया झाडाच्या निकट, व निकट होत जाते, आणि छाया तीच गोष्ट बनते.

46 आता, देवाच्या आत्म्याने नीतिमान ठरण्याअंतर्गत लुथरअंतर्गत कार्य केले आहे, वेस्ली अंतर्गत पवित्रीकरण, पेन्टिकॉस्ट अंतर्गत पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा; आणि येथे शेवटच्या दिवसात तो सादर करीत आहे आणि प्रत्यक्ष त्याच गोष्टी कार्य करीत आहेत ज्या त्याने तो ख्रिस्तामध्ये असताना केल्या! ते काय आहे? मंडळी आणि ख्रिस्त एक झाले आहेत. आणि जेवढ्या लवकर ते एकत्र जुळतील, ते शेवटाची साखळी, ती आरोळी मारीत आकाशातून जाईल. वेस्ली वर येईल, लुथर, इतर त्यांतील सर्व मागच्या तेथे त्या दिवसातील. तो जो पहिला तो शेवटचा असेल; तो जो शेवटचा तो पहिला असेल; आणि तेथे पुनरुत्थान येईल.

आपण अंत समयात आहोत. ऐका! तेच काय ते पवित्र आत्मा करतो: नीतिमान ठरण्याद्वारे पवित्र आत्मा (पहा), फक्त एक लहानशी त्याची सावली; पवित्र करणाद्वारे पवित्र आत्मा, एक लहानशी गडद त्याची सावली; पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याद्वारे पवित्र आत्मा, एक अजून गडद सावली; आता प्रत्यक्ष त्याच्या व्यक्तीच्या पुनःस्थापनेद्वारे पवित्र आत्मा येथे आहे, चिन्हे आणि अद्भुते घडवीत आहे जसे त्याने सुरुवातीला केले. हू! गौरव! कसेही करुन तुम्ही मला पवित्र लोळणारा म्हणणार आहात; तुम्ही देखील सुरु करु शकता आता.

47 भावांनो, ऐका. हे ऐका! "सर्व मेजे वांतीने भरली आहेत; तेथे निर्मळ जागा उरली नाही. तो कोणाला ज्ञान शिकवेल? कोणाला तो ज्ञात करुन देईल ... समजावून देईल. त्यांना जे थान तुटे आहेत, ज्यांचे दूध तुटलेले आहे." लहान बालकांना नाही, प्रेसबायटेरियन बालके, नाजरीन बालके; त्याला कोणीतरी हवे जो थानापासून दूर होण्यास इच्छुक आहेत आणि काही कठीण मांस खाण्यास इच्छुक आहेत. येथे ते येते!

कारण नियमावर नियम; नियमावर नियम; कानुवर कानू; कानुवर कानू; थोडे येथे, थोडे तेथे:

असे तो बोलत असतो तोतऱ्याच्याद्वारे परभाषेत तो या लोकांशी बोलेल.

तो त्यास म्हणाला होता, ही विश्रांती आहे भागलेल्यास विसावा द्या; याने त्यास आराम होईल: तरी ते ऐकेतना. [पवित्र आत्मा.]

जर ते त्याच प्रकारे पेन्टिकॉस्टच्या दिवशी आले नाही का, ते येण्याच्या अगोदर ७१२ वर्षांपूर्वी भविष्यवाणी केली होती. येथे ते पेन्टिकॉस्टच्या दिवशी, अगदी तंतोतंत आले.

48 कोणीतरी म्हणाले, "शब्बाथ दिवस पाळणे." मी कोणाच्या मंडळीला किंवा धर्माला नाकारीत नाही किंवा हलके मानीत नाही, परंतु म्हणतो, "शब्बाथ दिवस, देवाचा शब्बाथ हा विश्रांती दिवस होता." येथे तो विश्रांतीचा दिवस आहे. "ही विश्रांती आहे," तो म्हणाला, "भागलेल्यांना विसावा द्या." ते हे आहे, आमेन! ते नियमावर नियम, कानेवर काना आहे! तेथे विसावा आहे. पवित्र आत्मा काय आहे? ती विश्रांती आहे.

अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या, म्हणजे मी तुम्हास विसावा देईन.

तो काय आहे? तो एक जो तुमच्यामध्ये येतो, तुम्हाला शांती देतो, तुमचे चिन्ह, तुमचा कैवारी. सांत्वन केले, विसावा दिला, शिक्का मारला!

ते एक चिन्ह आहे. जगाला कळते तुम्हाला काहीतरी झाले आहे. ते काय आहे? तो एक कैवारी आहे. तो काय आहे? एक शिक्का. तुम्ही विसाव्यात आहात. तो तुमचा वकील आहे. जर तुम्हाला काहीतरी होते, तेथे काहीतरी तुमच्यासाठी वकिली करण्यासाठी आहे लागलीच (पहा), मध्यस्थी करीत आहे. ते देवाचा आत्मा मंडळीमध्ये राहत आहे, जेव्हा तो येईल तो काय असेल याची तंतोतंत भविष्यवाणी केली होती; ती सार्वकालिक, अनंत विश्रांती असेल!

49 देवाने जग बनविले (इब्री चवथा अध्याय) देवाने जग बनविले आणि सातव्या दिवशी विसावा घेतला. ते बरोबर आहे! आठवा दिवस मागे येतो.... तो त्याने यहुद्यांना करारासाठी दिला काही विशिष्ट समयाच्या अवधीसाठी. ते बरोबर आहे. परंतु ते जात आणि एक दिवस विश्रांती घेत, आठवड्याच्या पहिल्या दिवशी परत जात, परत नव्याने सुरुवात करीत. तो विसावा नाही ज्याबद्दल देव बोलला. जेव्हा देवाने जग सहा दिवसात बनविले, जेव्हा तो विश्रांती करण्यास गेला, त्याने त्यानंतर विसावाच घेतला. ते बरोबर आहे. ते त्याने कायम केले. तो परत आठव्या दिवशी आला नाही आणि परत सुरुवात केली नाही; ती केवळ एक छाया होती.

आता, ते एक प्रतीक होते जसे सूर्यासाठी चंद्र. परंतु जेव्हा सूर्य वर येतो, आपल्याला त्यापुढे चंद्राची गरज भासत नाही. आता, लक्ष द्या याकडे! ओह, प्रकटीकरण ११ मध्ये, स्त्री तिच्या पायाखाली चंद्र आणि तिच्या डोक्यावर सूर्य आहे. ओह, आपण पवित्र शास्त्रात पहिल्या पानापासून ते शेवटच्या पानापर्यंत जाऊन, तुम्हाला दाखवू शकतो, पहा.

50 परंतु ते काय आहे? जेव्हा इब्री चवथ्या अध्यायात पवित्रशास्त्र म्हणते, जर येशूने त्यांना विश्रांती दिवस दिला असता, त्यानंतर तो त्याबद्दल बोलला असता; तो विसाव्याच्या दिवसाचे बोलला असता. तो कोणत्या दिवसाबद्दल विसावा असे बोलला?

अहो कष्टी व भाराक्रांत हो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हास विसावा देईन. [मत्तय ११वा अध्याय, २८वे पद.]

पहा! मग आपल्याला आढळले की जेव्हा आपण त्यामध्ये आलो, "कारण तो," इब्री ४ मध्ये म्हणाला, "जो येशूच्या विसाव्यात प्रवेशला आहे तो त्याच्या जगिक कृत्यापासून संपला आहे जसा देवाने त्याच्या कृत्यापासून विसावा घेतला आहे, जेव्हा त्याने जग बनविले परत कधीही त्यामध्ये परतला नाही!" किती काळ? किती काळासाठी तुम्ही पवित्र आत्म्याद्वारे मुद्रित झाला आहात? तुमच्या उद्धाराच्या दिवसापर्यंत! तेथे तो विसावा आहे, सांत्वन, वकील, शिक्का, सोडविणारा. ओह, मी थोडासा उत्साहित होतो, किंवा मी एक प्रकारे आशीर्वादित होतो. ओह!

51 "ते आपल्यासाठी अभिवचन आहे का, भाऊ ब्रॅन्हम? ते पवित्रशास्त्राद्वारे सिद्ध झाले आहे का?" ठीक आहे, आपण योएलमध्ये जाऊया. योएल या संबंधी काय म्हणाला ते शोधूया. देवाच्या आशीर्वादित वचनासाठी मी किती आभारी आहे. तुम्हाला ते आवडते? मी विचार करतो जर हे वचन नसते, तर मला ठाऊक नाही आपण कुठे उभे असतो. ठीक आहे, आपण आता योएलमध्ये आहोत; आपण योएलच्या दुसऱ्या अध्यायात जात आहोत, आणि आपण अठ्ठाविसाव्या पदापासून सुरुवात करणार आहोत, योएल २:२८. ख्रिस्ताच्या येण्याच्या आठशे वर्षांपूर्वी, संदेष्ट्याने आत्म्यामध्ये, आता ऐका:

यानंतर असे होईल, की मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन; ... तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील, तुमच्या वृध्दास स्वप्ने पडतील, तुमच्या तरुणास दृष्टांत होतील:

तुमचे दास व दासी यावर ही त्या समयी मी आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन.

मी आकाशात व पृथ्वीवर, रक्त, ... अग्नी, व धुराचे लोळ अशी चिन्हे दाखवीन.

परमेश्वराचा महान व ... भयंकर दिवस येण्यापूर्वी, सूर्य अंधकारमय, व चंद्र रक्तमय होईल.

तेव्हा असे होईल, की जो कोणी परमेश्वराचा धावा करील तो तरेल:

52 ओह! काय? योएल. तुम्ही लक्ष दिले प्रेषित २ मध्ये, पेत्राने हेच पद घेतले, म्हणाला, "इस्राएलाच्या लोकांनो, माझे शब्द ऐका. हे मद्य प्यायलेले नाहीत (हे शिक्का मारलेले, सांत्वन पावलेले, असाधारण, खूण केलेले लोक). जसा तुम्ही विचार करता तसे ते मद्य प्राशन केलेले नाही (प्रेषित २), असे पाहता की हा दिवसाचा तिसरा प्रहर आहे. परंतु हे ते आहे जे योएल संदेष्ट्याद्वारे बोलले गेले होते, म्हटले, 'शेवटच्या दिवसात असे होईल की मी सर्व मनुष्यमात्रावर मी माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन!'" ते काय आहे? पवित्र आत्मा काय आहे?

ठीक आहे, आता, परत लक्ष देऊया. विश्वासूंसाठी अभिवचन आहे, तेच जे काही ते आहे. आता, हा पवित्र आत्मा, आपण शोधून काढले तो काय आहे, फक्त एक मिनिट. त्याचे कोणाला अभिवचन दिले गेले आहे? विश्वासूंना. आता, लुक मध्ये जाऊया, लुकचा चोवीस अध्याय, येशूने पृथ्वी सोडण्याअगोदर त्याच्या शेवटच्या शब्दात काय सांगितले ते ऐका, लुक चोवीसावा अध्याय. आणि तुम्ही जे आता लिहून घेत आहात, तुम्ही ते खूण करुन घेऊ शकता, मग त्याचा अभ्यास करा उद्या जेव्हा तुमच्याकडे अधिक वेळ असेल. आता, लुक २४:४९, येशू बोलताना ऐका. शेवटी जेव्हा तो गौरवामध्ये आरोहण करीत होता, आरोहण, येथे ते शब्द आहेत जे तो त्याच्या शिष्यांना म्हणाला:

...पहा, मी माझ्या पित्याचे अभिवचन पाठवितो....

काय अभिवचन? तो शिक्का, ते चिन्ह, तो कैवारी, आणि या सर्व गोष्टी ज्याबद्दल मी बोललो आहे, त्याच्या हजारोपट अधिक.

मी माझ्या पित्याचे अभिवचन तुम्हावर पाठवितो: ...

काय अभिवचन? ते एक जे यशया म्हणाला येईल. "तोतऱ्याच्या जिव्हेद्वारे आणि परक्या भाषेत, मी या लोकांशी बोलेन. मी तो विसावा

तुमच्यावर पाठवीन. मी ते पाठवीन जे योएल बोलला: 'की शेवटच्या दिवसात, देव म्हणतो, मी माझ्या आत्म्याचा वर्षाव तुम्हावर करीन.' ओह, मी तुम्हाकडे पाठवीन आणि सर्व लोकांना, सर्व राष्ट्रांना यरुशलेमेपासून सुरुवात करुन ... मी अब्राहामाचे संतान या कराराखाली आणीन. मी त्यांच्यातील प्रत्येकाला मुद्रित करीन. पहा? मी माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन."

मी माझ्या पित्याचे अभिवचन तुम्हावर पाठवीन: परंतु तुम्ही वाट पहा ... [म्हणजे, "थांबा"] ... यरुशलेम शहरात, जोपर्यंत तुम्ही स्वर्गीय सामर्थ्याने युक्त होत नाही.

53 मग पवित्र आत्मा काय आहे? स्वर्गीय सामर्थ्य, बिशपकडून सामर्थ्य नाही, मंडळीकडून सामर्थ्य नाही, परंतु स्वर्गीय सामर्थ्य.

ते सामर्थ्य कसे आले? मंडळीत सामील होण्याद्वारे? जर तुम्ही ते बरोबर म्हणता मी तुम्हाला आव्हान करतो. मंडळीत सामील होण्याद्वारे, प्रचारकाला हात मिळविण्याद्वारे? नाही, महाशय! आता, तुम्ही कॅथोलिक, तुमची जीभ बाहेर काढता आणि पहिली सहभागिता करता? नाही, महाशय! ते कसे आले, स्वर्गीय सामर्थ्य?

आपण थोडेसे पुढे वाचूया. प्रेषित १:८ मध्ये जाऊया. आता ते एकत्र जमलेले आहेत. आता, ते येशू संबंधी येथे बोलत होते जेव्हा ते एकत्र जमले, आणि यहूदाची जागा घेण्यासाठी दुसऱ्या एकाला नियुक्त केले. प्रेषित १:८: तुमच्यावर पवित्र आत्मा आल्यावर, तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल: ... काय? तुम्ही ब्रॅन्हम प्रार्थना मंदिराचे सदस्य व्हाल? नाही! तुम्ही मेथडिस्ट मंडळी, कॅथोलिक मंडळी, प्रेसबायटेरियन मंडळीचे सदस्य व्हाल? तसे पवित्रशास्त्रात नाही; ती मानवनिर्मित शिकवण आहे. "परंतु एक प्रचारक झाल्यानंतर तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल!" नाही, महाशय! "तुम्ही कला शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल!" नाही, महाशय! "तुम्हाला तुमची डी.डी. मिळाल्यानंतर तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल!" नाही, महाशय! "तुम्ही पाण्यात बाप्तिस्मा घेतल्यानंतर तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल!" नाही, महाशय! "तुम्ही पहिली सहभागिता केल्यानंतर तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल!" नाही, महाशय! पहा, त्या सर्व मानवनिर्मित गोष्टी आहेत.

54 पवित्रशास्त्र काय म्हणते ते ऐका, येशू काय म्हणाला:

...पवित्र आत्मा तुम्हावर आल्यानंतर, तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल: ... [पवित्र आत्मा काय आहे? सामर्थ्य. मग यानंतर] ... तुम्ही साक्षी असाल ... [फक्त तुम्ही बारा, तुम्ही यरुशलेममध्ये साक्ष द्याल.] ... तुम्ही माझे साक्षी असाल दोन्ही यरुशलेमेत, ... यहूदात, ... शमरोनात, आणि पृथ्वीच्या शेवटापर्यंत. [जेथे अजूनपर्यंत पोहोचलेली नाही.]

आणि जेव्हा तो या गोष्टी बोलला, ते त्याला पाहत असताना, तो वर घेतला गेला; ढगात गेला आणि त्यांच्या दृष्टीपासून घेतला गेला.

आता, पलीकडचे पान उघडा. ह्या भविष्यवाण्या प्रत्ययास येताना पहा:

आणि जेव्हा पेन्टिकॉस्टचा दिवस पूर्णपणे आला, ते ते सर्व एका मतात एका जागी होते.

["आणि अचानक पाळक आत आला आणि...." मी तेथे रेषेखाली उतरलो, मी नाही का? "अचानक याजक वेदीवर आला." नाही!] आणि अचानक तेथे एक नाद झाला [फक्त बनविलेला विश्वास नाही, तो तेथे होता.] ... एक नाद [एक सेवक दाराजवळ येत होता! त्या याजकाकडे सहभागिता होती, तो पवित्रस्थानातून बाहेर येत होता. नाही, त्या प्रकारे काहीही नाही!] ... तेथे आकाशातून नाद झाला [पायाची सळसळ नाही.] ... तेथे आकाशातून नाद झाला ... मोठ्या वाऱ्याच्या सुसाट्यासारखा, [ओह, माझ्या! व्हुशशश!] आणि जेथे ते बसले होते ते सर्व घर त्याने भरले.

55 पवित्र आत्मा काय आहे? येथेच जेथे त्यांना सामर्थ्य मिळते; येथेच जेथे त्यांना थांबणे होते; येथे जे काही घडले जेव्हा त्यांनी तसे केले. सर्व उत्पत्तीपासूनच्या भविष्यवाण्या सरळ वर होत्या, अब्राहामापासून त्यामधून त्या सरळ आल्या, आणि कशा त्या आल्या, आणि परिणाम आले. ते काय आहे? मंडळीसाठी अभिवचन, विश्वासणाऱ्यांसाठी.

...आणि ... जेथे ते बसले होते ते सर्व घर त्याने भरले.

आणि तेथे वेगवेगळ्या होत असलेल्या अग्नीच्या जिभासारख्या ... जिभा त्यांना दिसल्या, व प्रत्येकावर एक एक अशा त्या बसल्या.

तेव्हा ते सर्वजण पवित्र आत्म्याने भरले, आणि आत्म्याने जसजशी त्यांना वाचा दिली, तसतसे ते निरनिराळ्या भाषांतून बोलू लागले. [आता, आपण त्यावर शुक्रवार रात्री बोलणार आहोत; आपण ते सरळ तेथेच सोडू.]

ते कसे काय? ते मंडळीसाठी अभिवचन आहे, पूर्णपणे एक अभिवचन. ठीक आहे.

56 आता, आता, ते भरल्यानंतर, ते किती काळापर्यंत मुद्रित झाले, ते आपण शोधून काढणार आहोत? येथे किती जणांना पवित्र आत्मा प्राप्त झाला आहे, तुमचे हात पाहू द्या. तेथे पवित्र आत्म्याचे अधिक आहेत त्यापेक्षा जे ते पवित्र आत्म्याविना आहेत. भावा, बहिणी, आम्हाला तुम्ही आमच्यातील एक हवे आहात. जेव्हा तुम्ही समजाल तो काय आहे, तो देवाचा आत्मा तुम्हांमध्ये देवाची कार्ये करण्याकरिता वास करतो. जेव्हा देवाने कधी त्याचा आत्मा त्याच्या कोणत्या सेवकांमध्ये, त्याच्या कोणत्या संदेष्ट्यांमध्ये, त्याच्या कोणत्या शिक्षकांमध्ये, त्याच्या कोणत्या प्रेषितांमध्ये पाठविला, ते नेहमी जगाकडून नाकारले गेले. ते तेथे असणाऱ्या प्रत्येक युगात वेडे समजले गेले. अगदी जेव्हा पौल अग्रिप्पासमोर उभा राहिला, तो म्हणाला, "ज्या मार्गाला पाखंड म्हणतात...." पाखंड म्हणजे काय आहे? "वेड." ज्या मार्गाला ते वेड म्हणतात, वेड्यांचा जमाव, त्याच मार्गाने मी माझ्या पूर्वजांच्या देवाची उपासना करतो." मी फार खुश आहे की मी म्हणू शकतो मी त्यांच्यापैकी एक आहे. होय, महाशय! ते

बरोबर आहे. मी फार खुश आहे की मी म्हणू शकतो मी त्यांच्यापैकी एक आहे.

57 आता, त्या पवित्र आत्म्याचा त्यांच्यावर वर्षाव झाल्यानंतर, त्याने त्यांना इतके प्रियकर बनविले, की त्यांचे सर्वकाही सामायिक होते. ते बरोबर आहे? माझ्या, माझ्या, काय एक संगती! काही वेळेस आपण ते गाणे गातो: "ओह, काय संगती, ओह, काय दैवी हर्ष...." बस एवढेच. ते काळजी करीत नसत की सूर्य उगवला आहे किंवा नाही. त्यांनी सुखसमाधानाचा फुलांचा बिछाना मागितला नाही. "आता, काही लोक मला म्हणतात, "मी पवित्र आत्मा स्वीकारीन, मिस्टर ब्रॅन्हम, जर तू मला ही हमी देतोस की मी लक्षाधीश होईल, जर तू मला हमी देतोस की मला तेलाच्या विहिरी सापडतील, आणि जर मी सोन्याच्या खाणी शोधीन, आणि मी...." पहा, लोक ते शिकवितात, आणि ते एक खोटे शिकवितात. देवाने त्या गोष्टीचे अभिवचन दिलेले नाही.

58 एक मनुष्य ज्याने कधी पवित्र आत्मा प्राप्त केला आहे तो पर्वा करीत नाही तो भाकरीसाठी भीक मागतो किंवा नाही; त्याने त्याला काही फरक पडत नाही; तो स्वर्गबद्ध निर्मिती आहे. त्याचे येथे अजिबात बंधन नाही! ते बरोबर आहे. तो काळजी करीत नाही; काही येवो, काही जावो, जे असेल. ते त्यांना टीका करु दे, थट्टा करु दे, नावलौकिक गमावू दे, तुम्ही कसली काळजी करता? तुम्ही तुमच्या मार्गावर गौरवाकडे आहात! हालेलूया! तुमची नजर ख्रिस्तावर लागलेली आहे, आणि तुम्ही तुमच्या मार्गावर आहात. तुम्ही पर्वा करीत नाही जग काय म्हणते. तोच काय तो पवित्र आत्मा आहे. तो एक सामर्थ्य आहे; तो एक शिक्का आहे; तो एक सांत्वनदाता आहे; तो एक वकील आहे; तो एक चिन्ह आहे. ओह, माझ्या! ते एक आश्वासन आहे की देवाने तुम्हाला स्वीकारले आहे.

मी किती वेळ घेतला आहे? माझ्याकडे अगदी अजून अधिक आठ मिनिटे आहेत. ठीक आहे. मला माझ्याकडे येथे पुष्कळ शास्त्रलेख आहेत. मी अंदाज करीत नाही मी त्यांना घेऊ शकतो, परंतु आपण आपला चांगला प्रयत्न करु.

आता, एक मनुष्य पवित्र आत्म्याने भरल्यानंतर, हे शक्य आहे का की छळ आणि गोष्टी त्याला मागे येण्यास कारणीभूत ठरतील आणि.... आता, त्याच्याकडे गमावण्यासाठी काही नाही; अजूनही तो देवाचा पुत्र आहे; तो नेहमी देवाचा पुत्र असणार, कारण तुम्ही किती काळ मुद्रित झाला आहात? [मंडळी म्हणते, "मुक्तीच्या दिवसापर्यंत."] ते बरोबर आहे. तेच काय ते पवित्रशास्त्र म्हणते.

59 आता, शिष्यांना मारल्यानंतर; त्यांची थट्टा केली गेली, चिडवले गेले, आणि सर्वकाही; त्यांनी विचार केला थोड्या वेळासाठी एकत्र मागे जाण्याचा हा वेळ आहे. प्रेषितांच्या चवथ्या अध्यायात आपण वळूया आणि पाहू काय घडले. आता, हे तुम्हा लोकांसाठी ज्यांना अगोदरच तो प्राप्त झाला आहे, त्यांच्यासाठी आहे. प्रेषित चवथा अध्याय. आता, पेत्र व योहान यांना मारले गेले, मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ आरोग्य सेवा घेतल्या कारणाने त्यांना कैदेत टाकले गेले. किती जणांना ते ठाऊक आहे? तेथे एक मनुष्य पडलेला होता जो एक प्रकारे पांगळा होता; तो चालू शकत नव्हता, चाळीस वर्षांपासून त्या प्रकारेच होता. आणि पेत्र तेथून गेला, आणि तो म्हणाला ... त्याने त्याचे भांडे काहीतरी खाण्यासाठी त्याच्या भांड्यात टाकावे म्हणून पुढे केले. (आणि पेत्राने दाखविले की तो एक पवित्र आत्म्याने भरलेला प्रचारक होता; त्याच्याकडे काही पैसे नव्हते.) तो म्हणाला, "चांदी व सोने माझ्याकडे काही नाही." पहा, तो त्याची पर्वा करीत नव्हता, परंतु तो स्वर्गबद्ध निर्मिती होता! ओह कशी मी इच्छा करतो आपल्याकडे वेळ असता तेथे त्यावर थोडा वेळ राहण्यासाठी, पहा. तो स्वर्गबद्ध होता; त्याचे सांत्वन केले गेले होते; त्याच्याकडे आत्मा होता; त्याच्याकडे सामर्थ्य होते; तो पुढे चालला, म्हणाला, "चांदी व सोने माझ्याकडे काही नाही, परंतु जे काही माझ्याकडे आहे, ते मी तुला देतो."

60 शंका नाही तो मनुष्य म्हणाला, "महाशय, तुझ्याकडे काय आहे?"

"माझ्याकडे विश्वास आहे. माझ्याकडे माझ्या हृदयात काहीतरी आहे जे सुमारे दहा दिवस अगोदर सुरु झाले. मी तेथे वरच्या माडीवर होतो, आणि अचानक, ती सर्व अभिवचने जी देवाने दिली होती.... मी येशू ख्रिस्ताबरोबर साडे तीन वर्षे चाललो. मी त्याच्याबरोबर मासेमारी केली, मासे बाहेर खेचले; मी या भिन्न गोष्टी केल्या. आणि मी त्याला आजाऱ्यांना बरे करताना पाहिले होते. तो मला सांगत असे, 'माझ्यामध्ये पिता आहे; परंतु जेव्हा मी निघून जाईन, तो तुझ्यामध्ये येईल.' तेव्हा, मी ते समजू शकलो नाही. परंतु तो म्हणाला, 'आता, तू ते समजावे अशी मी अपेक्षा करीत नाही. तुम्हाला ह्या गोष्टी समजत नाहीत; तुम्हाला त्या सहज मिळतात.'" अजून ही मला त्या समजत नाही. आणि मला सांगू नका तुम्ही समजता, कारण तुम्ही समजत नाही, पहा. तेव्हा मी त्या समजू शकत नाही; मी त्या स्पष्ट करु शकत नाही; परंतु केवळ गोष्ट मला ठाऊक आहे, मला तो मिळाला आहे.

61 "बरे," तुम्ही सांगता, "ते वैज्ञानिकरित्या नाही." ओह, निश्चित ते आहे.

त्या प्रकाशाकडे पहा. जेव्हा बेंजामिन फ्रँक्लीनने तो पकडला, तो म्हणाला, "मला तो मिळाला." त्याला ठाऊक नव्हते त्याच्याकडे काय होते, परंतु ते त्याच्याकडे होते. आणि आज रात्री मला कोणीतरी हवे आहे जो मला सांगेल वीज काय आहे. अजून ही त्यांना ठाऊक नाही ती काय आहे, परंतु आपल्याला मिळाले आहे. आमेन! ते बरोबर आहे. तेथे कोणता मनुष्य नाही ज्याला ठाऊक आहे वीज काय आहे. ते तिला उत्पन्न करतात, प्रकाश पाडू शकतात, तिला जाळू शकतात, तिला कार्यास लावू शकतात; परंतु ती जनरेटरद्वारा निर्मिती केली जाते (दोन भाग अशा प्रकारे एकत्र धावतात; ते तिला उत्पन्न करतात), आणि तेच सर्व त्यांना ठाऊक आहे. ती प्रकाश देते; तिच्यामध्ये सामर्थ्य आहे.

आणि ते देवाच्या आत्म्यासारखे आहे. जेव्हा तुम्हाला मिळतो.... एक भाग तुम्ही आहात, आणि दुसरा भाग देव आहे; आणि त्यांना अशा प्रकारे एकत्र चालविणे आहे, ते तुमच्यासाठी काहीतरी करील. ते बरोबर आहे! ते प्रकाश देईल; ते सामर्थ्य देईल. ते काय आहे ते तुम्हाला ठाऊक नाही, आणि कधीही कळणार नाही ते काय आहे, परंतु तुम्हाला कळते जेव्हा तुम्हाला ते मिळते. ती एक गोष्ट निश्चित आहे. आणि ती तुमच्यासाठी आहे; तो तुमचा आहे! तो आश्वासन आहे. ते बरोबर आहे. तो प्रकाश काय दाखवितो? तेथे आश्वासन आहे तो एक प्रकाश आहे.

62 आता, हे लक्षात घ्या. आता, ते काय आहे हे तुम्हाला ठाऊक नाही. परंतु ही माणसे म्हणाली, "बरे," ते म्हणाले एक गोष्ट त्यांना ठाऊक होती, "आम्हाला ठाऊक आहे ते अज्ञानी आहेत," काही अधिक वेडे (तुम्ही पहा) जसा तो लहान जर्मन म्हणाला तो होता, पहा. म्हणाला, "ते अज्ञानी व अशिक्षित होते, परंतु ते त्या कोळ्याबरोबर, त्या पलीकडील खालच्या येशू म्हटलेल्या, सुताराबरोबर होते (मी तुम्हाला सांगेन) कारण ते त्याच गोष्टी करीत आहेत ज्या त्याने केल्या.

तोच काय तो पवित्र आत्मा आहे, तो अज्ञानी कोळ्यामध्ये येशू राहत आहे, एक सुतार, किंवा जे काही असेल - अज्ञानी प्रचारक, जे काही ते असेल. तो एक मनुष्य आहे ज्याला जगाच्या गोष्टींकरिता अज्ञानी असायचे आहे आणि येशूला त्याच्यामध्ये येऊ द्यायचे आहे, देवाचा आत्मा, तो शिक्का, तो सांत्वनदाता. तो नावलौकिकाची पर्वा करीत नाही; केवळ गोष्ट त्याला हवी आहे ती देव आहे!

63 जेव्हा देव अनुक्रमात मांडत होता, तो म्हणाला, "तुम्ही सर्व लेवी, मी तुम्हाला बाहेर पाचारण केले आहे आणि तुम्हाला याजक बनविले आहे. आणि तुझे सर्व बंधुजन, बारा वंश ... इतर अकरा वंश तुला दशमांश देतील."

"जेव्हा तुम्हाला सफरचंदाच्या नऊ टोपल्या मिळतील, त्यातील एक लेव्यांना द्या. जेव्हा तुम्ही तुमची मेंढरे येथून न्याल, त्यातील दहावे उचला. मी पर्वा करीत नाही जर ते लहान आहे, किंवा मोठे आहे, जाड आहे, किंवा दुर्बल आहे; ते लेव्यांच्या मालकीचे आहे.

"आता, लेवी, जेव्हा तुम्हाला हे सर्व मिळेल, मग तुम्ही देखील परमेश्वराला दशमांश द्या. तुम्ही ओवाळणीचे अर्पण करा, पेंढीचे अर्पण करा, भिन्न अर्पणे करा. तुम्ही परमेश्वराला दशमांश द्या."

म्हणाला, "मोशे, तुझ्या भागासाठी, मी तुझा वाटा आहे." ओह, माझ्या! तो म्हणाला, "मी तुझा समाधानाचा भाग आहे." तेच काय ते आज पवित्र आत्मा मंडळीसाठी आहे. रुपे व सोने माझ्याकडे काही नाही, परंतु माझ्याकडे समाधानाचा भाग आहे! हालेलूया! शिक्षण, मी महतप्रयासाने पुस्तक वाचू शकत नाही; परंतु माझ्याकडे समाधानकारक भाग आहे! तो चांगला आहे. डॉक्टरची पदवी, माझ्याकडे कोणतीही नाही, पि.एच.डी, किंवा एल.डी., किंवा इतर काहीही नाही. परंतु तेथे एक गोष्ट माझ्याकडे आहे: एक समाधानकारक भाग; तोच तो भाग मला हवा आहे. तोच तो भाग देवाला हवा आहे की तुमच्याकडे असावा. या इतर सर्व जुन्या गोष्टी फेकून द्या, सर्व नावलौकिक आणि इतर सर्वकाही, आणि बाहेर पडा, आणि देवाचा समाधानकारक भाग घ्या; कारण या पृथ्वीवरील जे काही तुमच्याकडे आहे, तुम्ही ते जाताना येथेच सोडून जाल. परंतु जर तुम्हाला तो समाधानकारक भाग मिळाला असेल, तो तुम्हाला अगदी निश्चितपणे वर नेणार जसा....

64 आपण नेहमी विमा घेतो आज दफनविधीची व्यवस्था पाहणाऱ्याला देण्यासाठी. आपण देवाचा समाधानकारक भाग घेऊया आणि खाली नेणाऱ्याऐवजी वर नेणाऱ्याला घेऊया. (तुम्हाला माहित आहे, ते दोन्ही कार्य करतात.)

आता, आपण पाहूया.

...जाऊ दिल्यानंतर, ते त्यांच्या स्वतःच्या मित्रमंडळीकडे गेले, ...

मागे याजकाकडे नाही. पहा, ते दाखविते की त्यांच्याकडे तो होता. ते परत मागे त्या जुन्या, थंड, बाह्यस्वरुपाच्या गोष्टीकडे जाणार नव्हते. नाही! मागे जा आणि सांगा, "आता, येथे पहा त्यांनी आम्हाला काय केले." नाही, नाही! त्यांच्याकडे त्यांचा स्वतःचा जमाव होता; तेथे केवळ एक डझन होते, परंतु तो जमाव पुरेसा होता, लहानसे मूठभर लोक.

...जाऊ दिल्यानंतर, ...

त्यांनी त्यांना मारल्यानंतर व धमकाविल्यानंतर, म्हणाले, "जर परत कधी तुम्ही येशूच्या नावात बाप्तिस्मा दिला...." "ओह, ओह, मला तसे म्हणायचे होते." बरे, ते बरोबर आहे, पहा. "जर कधी तू परत येशूच्या नावात प्रचार केला, जे काही तू करशील, आम्ही तुला घेऊ!"

"हू, ती एक मोठी धमकी आहे. तेथे पलीकडे इतर बंधुजनांकडे जाऊया." ओह, त्याच प्रकारे आहे. ऐक्यामध्ये सामर्थ्य आहे; ऐक्यामध्ये सामर्थ्य आहे. म्हणाला, "तेथे पलीकडे बंधुजनांकडे जाऊया आणि आपण काय करु शकतो शोधूया."

65 आता, ते सर्व एकत्र आले आणि वेगवेगळे अनुभव सांगत होते.

...ते सुटल्यानंतर, आपल्या मित्रमंडळीकडे गेले, आणि मुख्य याजक व वडील मंडळी जे काही त्यांना म्हणाले होते ते सर्व त्यांनी सांगितले.

हे ऐकून, ते एकचित्ताने देवाला उच्च स्वराने म्हणाले,

आता, ऐका ते काय म्हणाले. त्यांना पहा; त्यांना पहा मागे जाऊन नाही आणि म्हणाले, "ओह," त्याबद्दल दुसरेच काहीतरी, "हे, परमेश्वरा, मी फार दुखी आहे." नाही! ते अगोदरच तारण पावलेले होते; ते आत्म्याने भरलेले होते; त्यांच्याकडे अनंत जीवन होते.

... ते एक चित्ताने ... देवाला उच्च स्वराने, म्हणाले, परमेश्वरा, तूच देव आहेस, [आमेन! मला ते अगदी आवडते, भाऊ पाल्मर, मला ते आवडते.] ... तू देव आहेस, [आम्हाला ते ठाऊक आहे.] ज्याने आकाश, आणि पृथ्वी, आणि समुद्र, आणि त्यामध्ये जे काही आहे ते उत्पन्न केले आहे:

तुझा दास दावीद याच्या मुखाद्वारे तू ... म्हणालास,...

66 आता पहा, ते परत येणार आहेत, म्हणतील, "आपण नाही...." आता, तुम्ही तेथे बाहेर जा आणि म्हणा, "बरे आता, परमेश्वरा, आता, एक मिनिट येथे थांब. ते अगदी माझी एवढी थट्टा करतात!" तो नाही का म्हणाला ते तसे करतील? "जे ख्रिस्त येशूमध्ये सुभक्तीने आयुष्यक्रमण करावयास पाहतात त्या सर्वांचा छळ होईल."

"बरे, तुम्हाला माहित आहे, माझ्या मालकाने मला सांगितले जर त्याने पकडले...." त्याने सांगितले नाही का ते तसे म्हणतील?

"बरे, तुम्हाला माहित आहे, त्या दिवशी त्यांनी मला न्यायालयात खेचले त्याबद्दल...." तो नाही का म्हणाला माझ्या नावाखातर ते तुम्हाला राजासमोर आणि अधिकाऱ्यांसमोर आणतील? "तुम्ही काय बोलावे याचा विचार करु नका, कारण ते तुम्ही नाहीत जे बोलणार आहात (मी ते काल घडताना पाहिले). तो पवित्र आत्मा आहे जो तुम्हांमध्ये वास करतो; तो बोलण्याचे काम करील," पहा. आमेन! ते बरोबर आहे. ठीक आहे. "तुम्ही काय बोलावे याचा विचार करु नका."

67 परमेश्वरा ... तुझा दास दावीद याच्या मुखाद्वारे तू म्हणालास, परराष्ट्रे का खवळली, आणि लोकांनी व्यर्थ योजना का केल्या?

प्रभूविरुद्ध, व त्याच्या अभिषिक्त विरुद्ध ... पृथ्वीचे राजे उभे राहिले, व अधिकारी जमले.

...कारण खरोखरच, प्रभू, ज्याला तू अभिषेक केला, तो तुझा पवित्र पुत्र येशू त्याच्याविरुद्ध, त्या शहरात परराष्ट्रीय, व इस्राएल लोक ह्यांच्यासह, हेरोद, व पंत पिलात हे, ... एकत्र झाले,

ह्यासाठी की जे काही घडावे म्हणून तू स्वहस्ते व स्वसंकल्पाने पूर्वी योजिले होते ते त्यांनी करावे.

ओह, माझ्या! मला ते आवडते. "परमेश्वरा, ते प्रत्यक्ष तीच गोष्ट करीत आहेत जी तू म्हणालास ते करतील." का, पवित्रशास्त्र म्हणते, "शेवटच्या दिवसात, तेथे थट्टेखोर, हेकेखोर, गर्विष्ठ, देवापेक्षा अधिक सुखविलासाची आवड धरणारे, शांतता द्वेषी, चहाडखोर, असंयमी, जे चांगले त्याचा तिरस्कार करणारे, सुभक्तीचे केवळ स्वरुप दाखवून, तिचे सामर्थ्य नाकारणारे.... असे येतील." ते कधीही तेथे वर गेले नाही आणि सामर्थ्य प्राप्त केले नाही, "...यानंतर पवित्र आत्मा तुमच्यावर आला...." "सुभक्तीचे केवळ बाह्यस्वरुप दाखवून, तिचे सामर्थ्य नाकारणारे; अशापासून दूर रहा." तोच काय तो पवित्र आत्मा आहे, पहा. जे काही करण्याचा संकल्प केला आहे.

68 ...आता, परमेश्वरा, त्यांच्या धमक्यांकडे पहा: आणि तुझ्या दासांना, धैर्य दे की सर्व धैर्याने आम्ही तुझे वचन बोलावे, [ओह, मला ते आवडते! तो जुना इच्छेचा कणा बाहेर काढा आणि एक वास्तविक पाठीचा कणा घ्या तेथे. आता येथे पहा.] ... आम्ही तुझे वचन बोलावे,

आणि बरे करण्याकरिता तू आपला हात लांब करीत असता; [ओह, भावा! भुते मरत नाही, तसाच पवित्र आत्मा देखील मरत नाही, पहा.] ... बरे करण्याकरिता तू आपला हात लांब करीत असता; ... ती चिन्हे आणि अद्भुते तुझा पवित्र पुत्र येशू ह्याच्या नावाद्वारे केली जावोत. [तुम्ही पहा ते कशाबद्दल गोंधळ घालीत होते, तुम्ही नाही पाहत? आज ही ते तीच गोष्ट करीत आहेत, परंतु ते कणभर ही चांगले करीत नाही.]

आणि जेव्हा त्यांनी प्रार्थना केली, जेथे ते एकत्र जमले होते ती जागा हादरली; आणि ते सर्व पवित्र आत्म्याने परिपूर्ण होऊन, ... देवाचे वचन धैर्याने बोलू लागले.

माझ्या! जेव्हा ते वर गेले तेथे त्यांना काहीतरी मिळाले, त्यांना नाही का मिळाले? अभिवचन म्हणते.... तोच काय तो पवित्र आत्मा आहे, जो तुम्हाला धैर्य देतो, तुम्हाला सांत्वन देतो, तुम्हाला मुद्रित करतो, तुम्हाला चिन्ह देतो. ओह, माझ्या!

69 ऐका! (ओह, इच्छा करतो आपल्याकडे अगदी वेळ असता.) आपण फिलिप्पाबरोबर शमरोनात खाली गेलो असतो प्रेषित ८:१४ मध्ये (तुम्ही सर्व जे लिहून घेत आहात). त्यांना एक मोठा आनंद प्राप्त झाला होता; त्यांच्याकडे महान आरोग्यसेवा होती. परंतु ते येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा झालेले होते, परंतु त्यांनी पेत्राला बोलाविण्यासाठी यरुशलेमेला पाठविले होते. तो खाली आला आणि त्यांच्यावर हात ठेवले, आणि त्यांना पवित्र आत्मा प्राप्त झाला, प्रेषित ८:१४.

परराष्ट्रीय, तेथे एक कर्नेल्य नावाचा मनुष्य होता. तो एक अद्भुत मनुष्य होता, दशमांश द्यायचा, लोकांसाठी प्रार्थनामंदिर बांधले, देवाचा सन्मान करी, देवाला भिऊन वागे, एक चांगला मनुष्य, चांगला प्रेसबायटेरियन, मेथडिस्ट, बॅप्टिस्ट, किंवा इतर काहीतरी (पहा), एक फार चांगला मनुष्य. परंतु एक दिवस देव म्हणाला, "तो एक चांगला माणूस आहे, तेव्हा मी अगदी त्याच्यासाठी एक सभा पाठवीत आहे. त्याला त्याबद्दल सांगण्यासाठी मी माझा एक प्रचारक घेईन ." ठीक आहे, तेव्हा त्याने एक दृष्टांत पाहिला आणि म्हणाला, "यापोस खाली जा, आणि तेथे तुला शिमोन नावाचा, एक कातडे कमवणारा आढळेल. आणि तेथे एक, शिमोन पेत्र, तेथे आहे. त्याला येथे येऊ दे; तो तुला मार्ग सांगेल, कारण त्याने काहीतरी प्राप्त केले आहे."

70 आणि पेत्र तेथे उभा असताना.... आणि कर्नेल्य त्या प्रचारकाला नमन करणार होता. पेत्र म्हणाला, "उभा रहा. मी देखील तुझ्यासारखा एक मनुष्य आहे." आणि पेत्राने हे शब्द बोलताच (कसे ते मागे गेले आणि मिळू लागले ... तीच गोष्ट ज्याबद्दल मी बोलत आहे; कसे देवाने पवित्र आत्म्याचा वर्षाव करण्याचे अभिवचन दिले) - तो हे शब्द बोलत असतानाच, त्यांच्यावर पवित्र आत्म्याचा वर्षाव झाला. हू! होय, तोच काय तो पवित्र आत्मा आहे, जो त्याच्यासाठी आहे. निश्चित! आणि ते सर्व पवित्र आत्म्याने भरले.

आता, लक्ष द्या! इफिसकरांसमध्ये, तेथे एक बॅप्टिस्ट भाऊ होता. तो प्रथम एक वकील होता, चलाख, बुद्धिमान माणूस, कायद्याची माहिती होती, मोठा माणूस, एक पंडित विद्वान. एक दिवस तो पवित्रशास्त्र वाचू लागला; त्याने पाहिले तेथे मसीहा नावाचा कोणी एक येणार होता.

आणि जेव्हा त्याने ते केले, का, तो या येशू विषयी ऐकू लागला, आणि तो म्हणाला, "माझी खात्री झाली आहे. आणि मी उघडपणे माझा विश्वास प्रकट करतो की येशू हाच ख्रिस्त आहे, देवाचा पुत्र." तो एक वास्तविक बॅप्टिस्ट होता. येथे तो सोबत आला, "मी उघडपणे म्हणतो की येशू हा ख्रिस्त आहे." तो ते इतके करु लागला की देवाने त्याला सेवेमध्ये पाचारण केले. देव नेहमी एका खऱ्या हृदयाशी बोलेल.

71 आणि तेथे एक लहान जुना तंबू बनविणारा होता ज्याचे नाव अक्विला व प्रिस्किल्ला होते, एक पती आणि पत्नी. ते तंबू बनविणारे होते. प्रेषित अठरावा अध्याय त्याबद्दल तुम्हाला सांगतो. ते पौलाचे.... मित्र होते. त्यांना पौलाच्या हाताखाली व त्याच्या शिक्षणाने पवित्र आत्मा प्राप्त झाला होता. त्यांनी ऐकले तेथे एक संजीवन होते, तेव्हा ते तेथे गेले. तेथे केवळ दहा किंवा बारा त्याला उपस्थित होते. तेव्हा तो तेथे पाहण्यासाठी गेला, आणि त्याने त्या प्रचारकाला ऐकले जो त्याच्या हृदयाच्या निष्ठेने प्रचार करीत होता; तो म्हणाला, "तुम्हाला माहिती आहे, मी विश्वास करतो तो सत्य ऐकेल." तेव्हा सेवा समाप्त झाल्यानंतर, त्याने त्याला तंबूपाठी बोलाविले आणि म्हणाला, "पहा, आमच्याकडे येथे एक लहान सुमारे इतका उंच, एक आकड्याच्या नाकाचा यहुदी भाऊ आहे; परंतु जेव्हा तो येथे येईल, तो देवाचे वचन अजून स्पष्टपणे तुला शिकविल."

72 बरे, थोड्या वेळाने.... पौल त्याच सुमारास तुरुंगात होता (एक भयंकर जागा एका आधुनिक प्रचारकासाठी, नाही का?), परंतु तो तुरुंगात होता; परमेश्वराने त्याला तेथे ठेवले होते. तेव्हा भूमिकंप झाल्यानंतर, तुरुंगाला हादरविले, त्याने त्या तुरुंग अधिकाऱ्याला व त्याच्या कुटुंबाला घेतले आणि त्या सर्वांचा प्रभू येशूच्या नावात बाप्तिस्मा केला, आणि निघून गेला, आणि पलीकडे आला. आणि त्याने अगदी एका लहान मुलीमधून भूत काढले होते जी खाली तेथे भविष्य सांगत होती. आणि मग, ते तिच्यापासून फारच पैसे कमवीत होते, तेव्हा त्याने त्यांची टोळी अगदी उघड केली होती. तेव्हा मग, त्यासाठी त्यांनी त्याला तुरुंगात टाकले; आणि परमेश्वराने तुरुंग हादरविला, कारण तेथे त्याच्याकडे लोकांचा एक जमाव होता जो सत्य ऐकणार होता. तुम्ही देवाच्या वचनाला बांधून ठेवू शकत नाही; काही फरक पडत नाही तुम्ही काय करता. तुम्ही अगदी ते करु शकत नाही.

73 तेव्हा, तो तेथे आला जेथे हा मनुष्य होता, आणि अक्विल्ला व प्रिस्किल्ला होती. कदाचित त्यांनी काही भाकरी खाल्ली असेल, आणि सरळ भाकरी खाल्ल्यानंतर, ते संजीवनाला जाणार होते. तेथे पौल मागे बसला, आणि त्याने त्याचा लहानसा झगा पकडला, आणि या बॅप्टिस्ट प्रचारकाचा प्रचार करताना ऐकला, म्हणाला, "ते चांगले आहे जो तू प्रचार केला, परंतु तेथे त्यामध्ये काही अधिक आहे." म्हणाला, "मला तुला एक प्रश्न विचारावयाचा आहे, डॉक्टर अपुल्लो. तू विश्वास केल्यापासून तुला पवित्र आत्मा प्राप्त झाला का?"

"ओह," तो म्हणाला, "आम्हाला माहित नाही तेथे तो होता.... पवित्र आत्मा म्हणजे तुला काय म्हणायचे आहे? आपण बॅप्टिस्ट आहोत."

म्हणाला, "तुला कसे माहित तू बॅप्टिस्ट आहेस?" पहा?

"बरे, आमचा बाप्तिस्मा झाला.... आम्हाला केवळ एकच बाप्तिस्मा ठाऊक आहे, योहानाचा."

तो म्हणाला, "त्याने केवळ पश्चातापासाठी बाप्तिस्मा दिला, म्हणत की जो येणारा आहे त्यावर तुम्ही विश्वास करा; जो येशू ख्रिस्त आहे." आणि जेव्हा त्याने हे ऐकले, त्यांचा येशू ख्रिस्ताच्या नावात परत बाप्तिस्मा झाला. आणि पौलाने त्यांच्यावर त्याचे हात ठेवले, आणि त्यांच्यावर पवित्र आत्मा आला, आणि ते अन्यभाषेत बोलले आणि भविष्यवाणी केली. ते "जो कोणी...." त्यांच्यासाठी आहे.

74 आता, आता, आपण ते कसे करतो? मला तुम्हाला काहीतरी सांगायचे आहे. आणि आपण समाप्त करु, कारण ते ... मी तुम्हाला सांगितले मी तुम्हाला लवकर सोडीन. तुम्हाला माहित आहे पवित्र आत्मा काय आहे. कारण आज रात्रीसाठी शेवटचा शास्त्रलेख (येथे माझ्याकडे दुसरा एक गठ्ठा आहे, परंतु आपल्याला ते गाळावे लागणार आहे), आपण १ करिंथकरांस १२ मध्ये वळूया. आणि मग, आपण हे वाचू, आणि मग आपण बंद करु. ठीक आहे. १ करिंथकरांस १२ वा अध्याय. कितीजण संत पौलाच्या शिक्षणावर विश्वास करतात? निश्चित! तो गलती १:८ मध्ये म्हणाला, "जर दूताने काहीतरी वेगळे शिकविले, तो शापित असो," प्रचारक बाजूलाच राहो. जर एका दूताने स्वर्गातून खाली येऊन, काहीतरी भिन्न शिकविले, तो शापित असो, पहा. त्याच्याशी काही करणे नाही. आता हे पहा, १ करिंथकरांस १२.

75 किती जणांना ठाऊक आहे पुनरुत्थानात जाण्यासाठी आपल्याला ख्रिस्तामध्ये असणेच आहे, कारण ते त्याचे शरीर आहे जे देवाने उठविण्याचे अभिवचन दिले आहे? तेथे दुसरा कोणता मार्ग नाही; तेथे अजून कोणता मार्ग नाही. जर तुम्ही ख्रिस्ताच्या बाहेर आहात.... कदाचित तुम्ही येथे मागे पाहाल आणि त्याच्यावर विश्वास कराल, म्हणाल, "निश्चित, मी त्याचा विश्वास करतो. तो देवाचा पुत्र आहे." चांगले, माझ्या भावा, जेव्हा तू असे म्हणाला मी तुझ्याशी हात मिळविण्यास तयार आहे. "मी त्याचा विश्वास करतो. तो माझा तारक आहे असे मी कबूल करतो." ते चांगले आहे, परंतु अजूनही तू त्याच्यामध्ये नाही. "मी प्रचारकाबरोबर हात मिळवीन. मी माझी पापे कबूल करीन." ते अजूनही त्याच्यामध्ये असणे नाही.

76 आता पहा! पहा पौल काय म्हणाला कसे तुम्ही ख्रिस्तामध्ये येता. कसे तुम्ही सुंता झालेले ओळखले जाता? अब्राहामाला, त्यांनी एक चिन्ह दिले. हे आता ऐका, १ करिंथकरांस बारावा अध्याय, आणि बाराव्या पदापासून सुरुवात करु:

कारण शरीर जसे एक असून, त्याला पुष्कळ अवयव असतात, आणि त्या ... शरीराचे अवयव, पुष्कळ असून, सर्व मिळून एक शरीर बनते: तसाच ख्रिस्त आहे, [विभागलेले नाही: एक. ऐका!]

[कारण एका मंडळीत - कितीजण माझ्यापाठी वाचित आहेत? - एका हात मिळविण्याद्वारे, एका पाण्याद्वारे.... नाही! मग कोणीतरी चुकीचे आहे.] ... एका आत्म्याद्वारे [ते मोठे अक्षर आहे का? मग तो पवित्र आत्मा आहे पहा.] ... आपण यहुदी असू किंवा हेल्लणी असू, गुलाम असू किंवा स्वतंत्र असू; एक शरीर होण्यासाठी आपणा सर्वाला एका आत्म्यामध्ये बाप्तिस्मा मिळाला आहे, आणि आपण सर्व एकाच

आत्म्याने संचरित झालो आहोत.

77 ख्रिस्ताचा देह एक आत्मा आहे, जेथे प्रत्येक सदस्य पेन्टिकॉस्टपासून या वेळेपर्यंत त्याच नव्या द्राक्षरसातून पीत आहे, तोच पवित्र आत्मा, तोच परिणाम आणीत आहे. कसे ते आपण करतो? एका आत्म्याद्वारे. ते देवाचे उघडे दार आहे; पवित्र आत्मा. तो काय आहे? तो देवाचा उघडा दरवाजा आहे; ते एक चिन्ह आहे; तो एक शिक्का आहे; तो एक सांत्वनदाता आहे; तो एक वकील आहे; तो एक आश्वासन आहे; तो विसावा आहे; तो शांती आहे; तो चांगुलपणा आहे; तो आरोग्य आहे; तो जीवन आहे; या सर्व गोष्टींसाठी ते देवाचे उघडे दार आहे. ते ख्रिस्तासाठी देवाचे उघडे दार आहे ज्याने.... देवाने सिद्ध केले की त्याने येशूला मेलेल्यातून उठविले. आणि जे ख्रिस्तामध्ये मेलेले आहेत देव त्यांना पुनरुत्थान समयी त्याच्याबरोबर आणेल. "पवित्र आत्म्याला खिन्न करु नका, मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही ख्रिस्तामध्ये मुद्रित झाला आहात." कितीजण त्याचा विश्वास करतात?

78 ख्रिस्त काय आहे? पवित्र आत्मा काय आहे? तो काहीतरी नाही ज्यावर लोक हसतात. तो काहीतरी आहे ज्यावर लोक हसतात, परंतु ते विश्वासणाऱ्यांसाठी नाही. अविश्वासणाऱ्यांसाठी.... मी इच्छा करतो माझ्याकडे दीर्घ दोन किंवा तीन आठवडे असते; मला उद्याची रात्र घेऊन, तुम्हाला सांगावेसे वाटते अविश्वासणाऱ्यांसाठी काय आहे. अगदी एका क्षणात मला ते अगदी सांगू द्या. तो हसण्याचा विषय आहे; तो सापळा आहे; तो अडखळण्याचा धोंडा आहे; तो मृत्यू आहे; तो देवापासून अनंत विभक्तपणा आहे. मी अगदी विचार करु शकत नाही त्या गोष्टी ज्या अविश्वासणाऱ्यांसाठी आहेत.

लक्षात ठेवा, त्याच पावसाची ज्याची अविश्वासणाऱ्यांनी थट्टा केली, त्याच पावसाने नोहा आणि त्याच्या कुटुंबाला वाचविले, पहा. तोच आत्मा (पवित्र आत्मा) ज्याची लोक मस्करी करतात आणि म्हणतात ते वेडे, आणि वेड्यांचा जमाव आहे, "ते वेडेपण आहे," तीच गोष्ट जी मंडळीला रुपांतरात नेईल आणि शेवटच्या दिवसात तिला वर नेईल, अविश्वासणाऱ्यावर न्याय आणील. ते बरोबर आहे! तोच काय तो पवित्र आत्मा आहे.

धन्य ते (मला हे माझ्या हृदयाच्या निष्ठेने सांगू दे): धन्य ते जे यासाठी भुकेले व तान्हेले आहेत, कारण ते तृप्त केले जातील.

79 उद्या रात्री आपण कसा काय तो करतो जेव्हा तो येतो यावर बोलणार आहोत.

आता, येथे किती जणांना पवित्र आत्मा प्राप्त करायला आवडेल आणि कोणीतरी तुमच्यासाठी प्रार्थना करावी असे हवे आहे, की तुम्हाला प्रकाश दिसेल? तुम्हाला माहित आहे तो काय आहे.

आता उद्या रात्री, तो काय करतो ते आपण घेणार आहोत, आणि मग पुढच्या रात्री तो कसा प्राप्त करायचा. मग आपण बोलावणार आहोत ... येथे लोकांना सूचना दिलेल्या आहेत, आणि सरळ खोल्यांमध्ये जातील आणि तेथे राहतील, जर ते संपूर्ण नाताळ घेईल (ते बरोबर आहे), जोपर्यंत पवित्र आत्मा येत नाही. आपण त्याकडे एका विवेकाने, पवित्रशास्त्राच्या आधाराने जाणार आहोत. आपण अगदी जसे देवाने अभिवचन दिले आहे आणि सुरुवातीला वर्षाव झाला तशाच प्रकारे आपण त्याकडे जाणार आहोत आणि तो घेणार आहोत. त्याच प्रकारे आपण येथे करण्यासाठी आहोत. त्याने काही फरक पडत नाही कोण काय म्हणते, आपण.... देवाच्या वचनाला माझ्या हृदयात प्राधान्य आहे. ते बरोबर आहे. आणि मला ते हवे आहे जे देवाने माझ्यासाठी ठेवले आहे. जर तेथे काहीतरी अधिक आहे, परमेश्वरा, स्वर्ग उघड, कारण त्यासाठी माझे हृदय उघडलेले आहे. ते बरोबर आहे.

80 कितीजणांना तो हवा आहे, आता तुमचे हात वर करा, म्हणा, "माझ्यासाठी प्रार्थना करा." आता, जेव्हा तुमचे हात वर आहेत: स्वर्गीय पित्या, आम्ही दीर्घ काळासाठी शिकविले आहे, परंतु तुझा आत्मा येथे आहे. आता तेथे हवेमध्ये हात वर आहेत, आणि त्यांना ठाऊक आहे तो काय आहे त्यांना ठाऊक आहे पवित्र आत्मा म्हणजे काय आहे. मी प्रार्थना करतो, देवा, की ही सभा समाप्त होण्यापूर्वी, की प्रत्येक हात जो येथे वर केला जाईल की त्याला तो प्राप्त झाला आहे. हे मान्य कर, परमेश्वरा.

आम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना करतो; आम्ही मागतो तुझ्याकडे त्यांना आशीर्वादित कर आणि त्यांच्या हृदयाची इच्छा त्यांना दे. त्यांच्या हाताकडे पहा, परमेश्वरा. ते तुझ्यावर प्रेम करतात; त्यांना तो हवा आहे. त्यांना ठाऊक आहे ते जाऊ शकत नाही.... उद्या रात्री, जर तू मला साहाय्य करशील, परमेश्वरा, आपण शास्त्रलेखात सिद्ध करु शकतो की ते याशिवाय रुपांतरात जाऊ शकत नाही. तेव्हा मी प्रार्थना करतो, पित्या, की तू त्यांना भूक व तहान दे, जेणेकरुन ते तृप्त केले जातील. आता मी त्यांना तुला सादर करतो, पित्या, आणि हे आशीर्वाद मान्य कर कारण आम्ही हे येशूच्या नावात मागतो. आमेन.

81 मी त्याला प्रेम करतो, मी त्याला प्रेम करतो,
कारण त्याने प्रथम मला प्रेम केले,
आणि माझे तारण
कलवरी झाडावर विकत घेतले.

आपण परत गाण्याअगोदर मला हे सांगायचे आहे. मला शुक्रवार रात्री सेवा सुरु होण्याअगोदर येथील खोलीमध्ये सेवकांच्या जमावाला भेटायचे आहे, पहा. शुक्रवार रात्री. तुम्ही पहा मी काय करण्याचा प्रयत्न करीत आहे? हे दाखवितो ते काय आहे, त्याकडे कसे जायचे, आणि कसला सन्मान करायचा. मग तुम्ही आंधळेपणाने येत नाहीत, काहीतरी चाचपडत. त्याच कारणामुळे मी आजरात्री कधीच विचारले नाही. मला हवे आहे की तुम्हाला समजावे ते काय आहे. ते एक अभिवचन आहे; तो एक शिक्का आहे; तो एक कैवारी आहे; तो इत्यादी आहे. मग उद्या

रात्री आणि पुढची रात्र, मग सरळ पुढे आपण जोपर्यंत तो येत नाही सुरु ठेवू. काळजी करु नका तो किती वेळ घेतो; आपण तोपर्यंत वाट पाहू. तुमचे हृदय स्वच्छ करा. तो कधीही अस्वच्छ हृदयात ओतणार नाही. योग्य व्हा! तयार रहा! आणि तो ते मान्य करील.

मी त्याला प्रेम करतो, मी त्याला प्रेम करतो,

(आपले हात वर करुया आता.)

कारण त्याने प्रथम मला प्रेम केले,

आणि माझे तारण

कलवरी झाडावर खरेदी केले.

82 पाळक आताच म्हणाले आहेत, आणि आम्ही सहमत आहोत, की उद्या रात्री आपण साडे सात ऐवजी सात वाजता सुरुवात करु. ते तुम्हाला साडे नऊ ऐवजी साडे आठ वाजता बाहेर सोडण्यास सहाय्य करील. उद्या रात्री गाण्याची सेवा सात वाजता सुरु होईल; मी साडे सात वाजता संदेशासाठी येईन.

मी त्याला प्रेम करतो, (आपले हातरुमाल काढा

आणि त्याच्यासाठी फडकवा.) मी त्याला प्रेम करतो,

(आता नेहमीचा पायंडा अगदी तोडा.)

कारण त्याने प्रथम मला प्रेम केले,

आणि माझे तारण

कलवरी झाडावर विकत घेतले.

ठीक आहे. तुमचा पाळक आता, भाऊ नेविल.

Sermons By
विल्यम मॅरियन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे प्रचार केले गेलेले उपदेश
"...वाणी होईल त्या दिवसात..." प्रकटी. १०:७

www.messagehub.info